सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ | वर्ष - ४ थे | अंक १४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सीबीडी बेलापूरमध्ये भीषण तिहेरी अपघात; ऑटोरिक्षाचालकाचा मृत्यू, दोन महिला जखमी

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सीबीडी बेलापूर परिसरात तीन वाहनांच्या भीषण अपघाताची घटना समोर आली आहे. आगरी कोळी गावाजवळील रेल्वे उड्डाणपुलावर दोन कार आणि एका ऑटोरिक्षाची धडक झाली. या अपघातात ऑटोरिक्षाचालकाचा मृत्यू झाला असून, दोन महिला गंभीर जखमी झाल्याची माहिती समोर आली आहे. या प्रकरणी सीबीडी बेलापूर पोलिसांनी एका कारचालकाविरोधात गुन्हा दाखल करून त्याला ताब्यात घेतल्याचे सांगण्यात येत आहे.

नेमका अपघात कसा झाला?

मिळालेल्या माहितीनुसार, 8 सप्टेंबर रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास हा अपघात झाला. पुणे येथील रहिवासी असलेले एक कारचालक सीबीडी बेलापूर सेक्टर 15च्या दिशेने जात होते. आगरी कोळी गावाजवळील रेल्वे उड्डाणपुलाच्या उतारावर त्यांची कार असताना मागून येणाऱ्या दुसऱ्या कारने धडक दिल्याचे सांगण्यात येते. मागून झालेल्या या धडकेनंतर पुढे असलेल्या कारला धक्का बसला आणि ती कार ऑटोरिक्षावर आदळली. या धडकेत ऑटोरिक्षा उलटली. त्यामध्ये चालक गंभीर जखमी झाला. मात्र, त्याचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात येत आहे.

**दोन महिला गंभीर जखमी :** या अपघातात दुसऱ्या कारमधील दोन महिला प्रवाशांनाही गंभीर दुखापत झाल्याची माहिती आहे. त्यांना उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आल्याचे सांगण्यात येते. अपघातामुळे कार आणि ऑटोरिक्षाचे मोठे नुकसान झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. अपघाताची नेमकी परिस्थिती, वाहनांचा वेग आणि धडक नेमकी कशामुळे झाली, याचा तपास सुरू करण्यात आला आहे.

**चालकाविरोधात गुन्हा :** या प्रकरणी सीबीडी बेलापूर पोलिसांनी संबंधित कारचालकाविरोधात भारतीय न्याय संहिता आणि मोटार वाहन कायद्यातील संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल केल्याची माहिती आहे. चालकाला ताब्यात घेण्यात आल्याचेही सांगण्यात येत आहे. दरम्यान, या अपघातातील मृत व्यक्ती, जखमी आणि आरोपीची ओळख तसेच वाहन क्रमांक याबाबत उपलब्ध माहितीत विसंगती किंवा अधिकृत पुष्टीचा अभाव असल्याने हे तपशील पोलिसांच्या अधिकृत नोंदीशी पडताळणे महत्त्वाचे आहे. अपघात नेमक्या कोणत्या परिस्थितीत झाला आणि यामध्ये कोणाची चूक होती, हे पोलीस तपासानंतर स्पष्ट होणार आहे. त्यामुळे सध्या निष्काळजीपणा किंवा अतिवेग हा अपघाताचा निश्चित कारणीभूत घटक होता, असे

# गणेशोत्सव पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपल्या सर्वांचीच - मुख्यमंत्री

### विद्यार्थ्यांनी साकारले बाप्पा पर्यावरणपूरक गणेशमूर्ती निर्मितीचा महाराष्ट्राचा 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड'

**ठाणे :** गणेशमूर्तीच्या भव्यतेपेक्षा भक्ती आणि पर्यावरण संवर्धनाला अधिक महत्व असून, गणेशोत्सवासारखा सांस्कृतिक वारसा जपणारा सण पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करणे, ही आपल्या प्रत्येकाची जबाबदारी आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.



वाशी येथील सिडको एक्झिबिशन अँड कन्व्हेन्शन सेंटरमध्ये आयोजित 'पर्यावरणपूरक महा गणेश मूर्ती कार्यशाळा २०२६' मध्ये ते बोलत होते. या भव्य कार्यशाळेत एकाच वेळी तब्बल १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी शाडूच्या मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्तींची निर्मिती करून 'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड'मध्ये महाराष्ट्राच्या नावावर नवा जागतिक विक्रम नोंदवला.

या ऐतिहासिक सोहळ्याला पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे, वनमंत्री गणेश नाईक, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष सिद्धेश कदम, आमदार मंदा म्हात्रे, आमदार रवींद्र फाटक, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या सचिव जयश्री भोज, नवी मुंबईच्या महापौर सुजाता पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त कैलास शिंदे, ठाण्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ आणि कला संचालनालयाचे संचालक डॉ. नितीन इंगळे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस यांनी उपस्थितांना संबोधित करताना सांगितले की, गणराया ही बुद्धीची देवता असून आपल्या संस्कृतीत पर्यावरणाला अनन्यसाधारण महत्व आहे. सृष्टीची निर्मिती करणाऱ्या पंचमहाभूतांचे रक्षण झाले तरच मानवी जीवन सुरक्षित राहू शकते.

मोठ्या गणेशमूर्ती, प्लास्टर ऑफ पॅरिस आणि कृत्रिम रंगांमुळे जलस्त्रोतांचे होणारे नुकसान टाळण्याचे आवाहन करताना ते म्हणाले की, मूर्ती लहान असो वा मोठी, भक्ती सारखीच असते. ईश्वराचा आशीर्वाद हा मूर्तीच्या आकारावर नव्हे, तर आपण पर्यावरण आणि समाजाची किती निस्वार्थ सेवा करतो यावर ठरतो.

गिनीज वर्ल्ड रेकॉर्डच्या परीक्षकांनी निकाल जाहीर करताच मुख्यमंत्र्यांनी या यशाचे खरे शिलेदार सहभागी विद्यार्थी असल्याचे सांगत त्यांचे कौतुक केले. तसेच पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, पर्यावरण विभाग, जे. जे. स्कूल ऑफ आर्ट आणि कला संचालनालयाच्या प्रयत्नांची विशेष प्रशंसा केली.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करताना सांगितले की, शाडू मातीपासून बाप्पा घडवणाऱ्या या हजारो विद्यार्थ्यांनी स्वतःला 'वसुंधरा रक्षक' म्हणून सिद्ध केले आहे. संस्कृती जपत पर्यावरण रक्षणाचा हा संदेश घराघरात पोहोचविणे हाच या उपक्रमाचा मूळ हेतू आहे.

ढोल-ताशांच्या मंगल गजरात आणि मूर्तिकारांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण परिसर भक्तिमय झाला होता. या कार्यशाळेचे मुख्य आकर्षण ठरले ते म्हणजे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे यांनी स्वतः शाडू माती हातात घेऊन गणेशमूर्ती साकारली. राज्याच्या सर्वोच्च नेतृत्वाला आपल्यासोबत मूर्ती घडवताना पाहून विद्यार्थ्यांचा उत्साह शिगेला पोहोचला. आपण स्वतः करू शकतो तर प्रत्येक कुटुंबही पर्यावरणपूरक बाप्पा साकारू शकते, असा ठाम आणि प्रत्यक्ष कृतीतून दिलेला संदेश या उपक्रमाने संपूर्ण समाजाला दिला.

शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, कला क्षेत्रातील तज्ज्ञ, प्राध्यापक आणि हजारो गणेशभक्तांच्या साक्षीने हा जागतिक विक्रम आणि पर्यावरण संवर्धनाचा जागर अत्यंत दिमाखात संपन्न झाला.

## पुण्याच्या विकासासाठी पीएमआरडीएचा मास्टर प्लॅन गतिमान करा; सुनेत्रा अजित पवारांचे निर्देश

**पुणे :** पुणे महानगर प्रदेशाच्या नियोजित आणि सर्वांगीण विकासासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा (PM-RDA) मास्टर प्लॅन गतिमान करून पायाभूत सुविधांची कामे वेगाने पूर्ण करण्याचे निर्देश उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी दिले. पुणे महानगर प्रदेशातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यासाठी सह्याद्री राज्य अतिथीगृहात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. PM-RDAच्या कार्यक्षेत्रात ६७४ गावांचा समावेश असून सुमारे ५,२१५ चौरस किलोमीटर क्षेत्र आहे. पुणे प्रदेशातील वाढती लोकसंख्या, वेगाने होणारे नागरीकरण, औद्योगिकीकरण आणि पर्यटनाच्या वाढत्या संधी लक्षात घेऊन पुढील अनेक वर्षांचा विचार करून पायाभूत सुविधांचे नियोजन करावे, अशा सूचना त्यांनी दिल्या.

पुणे इनर रिंग रोड, कॉम्प्रिहेन्सिव्ह मोबिलिटी प्लॅनअंतर्गत प्रस्तावित प्रकल्प, हिंगणगाव पूल आणि यवत रेल्वे ब्रिज यांसारख्या प्रकल्पांना गती देण्याच्या सूचना देण्यात आल्या. शहर आणि PMRDA क्षेत्रातील वाहतूक व्यवस्था सक्षम करण्यासाठी मल्टिमोडल हब, औद्योगिक क्षेत्रे, धार्मिक स्थळे, पर्यटनस्थळे आणि विमानतळ यांना जोडणारी प्रभावी कनेक्टिव्हिटी विकसित करण्यावर भर देण्यात आला.

माण-हिंजवडी मेट्रोला गती देण्याचे निर्देश

माण-हिंजवडी परिसरातील वाढती वाहतूक कोंडी लक्षात घेता माण-हिंजवडी-शिवाजीनगर पुणे मेट्रो लाईन-३चे काम तातडीने पूर्ण करण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. २३ स्थानकांच्या या मार्गिकेतील १२ स्थानकांचे काम पूर्ण झाले असून आणखी ५ स्थानके अंतिम टप्प्यात आहेत. उर्वरित कामे वेगाने पूर्ण करून मेट्रो सेवा लवकर सुरू करण्यासाठी संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करावे, असेही सांगण्यात आले.

**नद्यांचे प्रदूषण रोखण्याला प्राधान्य:**इंद्रायणी, पवना, मुळा आणि मुठा नद्यांचे प्रदूषण रोखण्यासाठीचे प्रकल्प तातडीने मार्गी लावण्याच्या सूचना देण्यात आल्या. केवळ प्रकल्प उभारणे पुरेसे नसून त्यांचे भविष्यातील संचालन, देखभाल-दुरुस्ती आणि खर्च भागविण्यासाठी संबंधित यंत्रणा आर्थिकदृष्ट्या सक्षम व स्वयंपूर्ण असणे आवश्यक असल्याचे सुनेत्रा अजित पवार यांनी स्पष्ट केले.

## ज्वेलरी दुकानातील कर्मचाऱ्याच्या कृत्याने मालकाला धक्का

**मुंबई :** मीरा-भाईंदरमध्ये तब्बल 4 किलो 300 ग्रॅम सोन्याच्या चोरीचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. एका दागिन्यांच्या दुकानातून कोट्यवधी रुपयांचे सोने लंपास करून राजस्थानला पळून गेलेल्या आरोपींचा मीरा-भाईंदर, वसई-विरार पोलिसांनी छडा लावला आहे. या प्रकरणात राजस्थानमधून दोन जणांना अटक करण्यात आली असून, त्यापैकी एक आरोपी संबंधित ज्वेलरी दुकानात जवळपास चार वर्षांपासून कर्मचारी म्हणून काम करत असल्याचे पोलिसांच्या तपासात समोर आले आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, चोरीची घटना 19 ऑगस्ट 2026 रोजी दुपारी 2 ते 4.15च्या दरम्यान घडली. दुकानातून सुमारे 4.3 किलो सोने चोरीला गेल्यानंतर पोलिसांनी तातडीने तपास सुरू केला. चोरीच्या सोन्याची किंमत चार कोटी रुपयांहून अधिक असल्याचे वृत्त आहे. तपासादरम्यान पोलिसांनी दुकान आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यासोबतच तांत्रिक तपासाच्या माध्यमातून संशयितांच्या हालचालींचा माग काढण्यात आला. आरोपी राजस्थानहून हरियाणाच्या दिशेने आणि त्यानंतर दिल्लीकडे गेल्याचे तपासात आढळल्याचे पोलिसांनी सांगितले.

# अनवाणी धावणाऱ्या माऊलीचा 'अवादा नारी शक्ती सन्मान' पुरस्काराने गौरव

### अवादा फाऊंडेशन उचलणार दोन्ही मुलींच्या शिक्षणाचा खर्च

**नांदेड, दि. १० (प्रतिनिधी) :** बीड जिल्ह्यातील अंबाजोगाई येथील ४७ वर्षीय विधवा रमाबाई रणवीर यांनी आपल्या मुलीच्या शिक्षणाची फी भरण्यासाठी मॅरेथॉन स्पर्धेत अनवाणी धावून बक्षिसाची रक्कम मिळवली होती. त्यांच्या या थक्क करणाऱ्या संघर्षाने आणि अतुलनीय धैर्याने संपूर्ण देशाचे लक्ष वेधून घेतले. वैयक्तिक संकटांशी लढा देत मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी त्यांनी दाखवलेली जिद्द ही प्रत्येक पालकासाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या या अलौकिक संघर्षाचा सन्मान करण्यासाठी अवादा फाउंडेशनच्या वतीने नांदेड येथील




एका महाविद्यालयात विशेष सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात रमाबाई यांना "अवादा नारी शक्ती सन्मान' सन्मानचिन्ह आणि पन्नास हजार रुपयांचा धनादेश देऊन गौरवण्यात आले.

या कौतुकास्पद उपक्रमासोबतच अवादा फाउंडेशनने रमाबाई यांच्या कुटुंबाला भक्कम पाठबळ देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यांची मोठी मुलगी आरती नांदेड येथे बी.एससी. चे शिक्षण घेत आहे, तर पूजा ही पोलीस भरतीची तयारी करत आहे. या दोन्ही मुलींच्या पुढील संपूर्ण शैक्षणिक खर्चाची आणि आवश्यक मार्गदर्शनाची जबाबदारी फाउंडेशनने अधिकृतपणे स्वीकारली आहे.

याप्रसंगी बोलताना अवादा फाउंडेशनच्या प्रतिनिधींनी सांगितले, "रमाबाईजींचा संघर्ष ही केवळ एका आईच्या प्रेमाची कहाणी नाही, तर प्रतिकूल परिस्थितीतही कधीही हार न मानणाऱ्या अखंड महिला शक्तीचे प्रतीक आहे. प्रगतीसाठी शिक्षण, सक्षमीकरण आणि प्रयत्न आवश्यक आहेत, आपल्या मुलांना शिक्षणाच्या माध्यमातून चांगले आयुष्य मिळावे, या रमाबाईजींच्या जिद्द आणि स्वप्नाला साथ देताना आम्हाला अभिमान वाटतो. भविष्यातही दोन्ही मुलींच्या गरजेनुसार त्यांना शक्य ती सर्व शैक्षणिक आणि मार्गदर्शनाची मदत अवादा फाउंडेशनकडून सातत्याने दिली जाईल."

रमाबाईंच्या या धाडसी प्रवासाला मिळालेली ही साथ समाजात शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित करते. अवादा फाउंडेशनच्या या पुढाकारामुळे दोन्ही मुलींच्या स्वप्नांना आता नवे पंख मिळाले आहेत.

# ग्रामसभा वाचवण्यासाठी वाघोळ्यातून महाराष्ट्रव्यापी आंदोलनाचा एल्गार

### 17 सप्टेंबरपासून बेमुदत उपोषण; मुख्यमंत्री फडणवीसांसह 11 ठिकाणी 15 मागण्यांचे निवेदन

तभा वृत्तसेवा

**वाघोळा, ता. फुलंब्री :** गावाच्या विकासाचा कणा असलेली ग्रामसभा नियमित आणि प्रभावीपणे सुरू राहावी, ग्रामपंचायत प्रशासनात पारदर्शकता व जबाबदारी निर्माण व्हावी, यासाठी वाघोळा येथून महाराष्ट्रव्यापी आंदोलनाची घोषणा करण्यात आली आहे. विकास शेषराव पाटील गायकवाड आणि सचिन श्रीमंत गायकवाड यांनी हा लढा उभारला असून, १७ सप्टेंबरपासून वाघोळा येथे बेमुदत उपोषण सुरू करण्यात येणार आहे.

ग्रामसेवक संघटनेच्या कामकाज बहिष्कारामुळे ग्रामसभांचे कामकाज प्रभावित होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कर्मचाऱ्यांच्या मागण्या शासनाने चर्चेतून सोडवाव्यात; मात्र त्याचा परिणाम ग्रामस्थांच्या लोकशाही अधिकारांवर होता कामा नये, अशी भूमिका आंदोलनकर्त्यांनी घेतली आहे.

यासंदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह राज्यातील ११ महत्त्वाच्या ठिकाणी १५ मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले आहे. संबंधित कार्यालयांकडून निवेदन स्वीकारल्याची पोहोचही घेण्यात आली आहे.

ग्रामसभा नियमित घेणे, ग्रामपंचायत प्रशासन पारदर्शक करणे, कर्मचाऱ्यांची बायोमेट्रिक हजेरी बंधनकारक करणे, ग्रामपंचायतीचा निधी, खर्च, विकासकामे व कर्मचारी उपस्थितीची माहिती डिजिटल माध्यमातून ग्रामस्थांना उपलब्ध करून देणे, अशा मागण्यांचा निवेदनात समावेश आहे. विकास पाटील गायकवाड हे १९९५ पासून ग्रामविकासाच्या विविध उपक्रमांशी जोडलेले आहेत. ग्रामसभा आणि लोकसहभागातून वाघोळ्याच्या विकासासाठी त्यांनी काम केले आहे. त्यामुळे ग्रामसभा सक्षम ठेवण्यासाठी वाघोळ्यातून सुरू होणारे आंदोलन महाराष्ट्रातील प्रत्येक गावाच्या लोकशाही हक्काचा आवाज असल्याचे त्यांनी सांगितले.

१७ सप्टेंबर रोजी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनापासून सुरू होणाऱ्या या उपोषणात राज्यातील ग्रामविकास कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, तरुण आणि ग्रामसभा सशक्तीकरणासाठी काम करणाऱ्या नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन विकास पाटील गायकवाड व सचिन गायकवाड यांनी केले आहे.

# जरांगे पाटील आता तुटेपर्यंत ताणू नका; विखेंवरील एकेरी टीका खपवून घेणार नाही

### मराठा आरक्षणासाठी विखे पाटील समितीने वर्षभर केलेले काम दुर्लक्षित करू नका; कोते यांचा इशारा

**शिर्डी, दि. १० (प्रतिनिधी) :** मराठा आरक्षणाचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी मराठा आरक्षण मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखालील समितीने वर्षभर सातत्याने प्रयत्न करून अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. मनोज जरांगे-पाटील यांच्याशी संवाद साधून त्यांच्या मागण्यांवर शासनाने सकारात्मक भूमिका घेतली आहे. अशा परिस्थितीत मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यावर एकेरी भाषेत टीका करणे मराठा समाज खपवून घेणार नाही, असा इशारा शिर्डीचे प्रथम नगराध्यक्ष कैलासबापू कोते यांनी दिला.

मराठा समाजाच्या मागण्यांसाठी सरकारने घेतलेल्या निर्णयांचा उल्लेख करत कोते म्हणाले, "मराठा समाजाच्या मागण्यांचा विचार करण्यासाठी उपसमितीने वर्षभर मेहनत घेतली. न्यायालयीन चौकटीत निर्णय टिकावेत, यासाठी कायदेशीर बाबी तपासून कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे प्रश्न सुटण्याच्या निर्णायक टप्प्यावर असताना आंदोलन ताणत नेण्यापेक्षा संवादातून मार्ग काढणे आवश्यक आहे."

निवृत्त न्यायमूर्ती संदीप शिंदे समितीने शोधलेल्या ५८ लाख कुणबी नोंदी ग्रामपंचायतींमध्ये प्रसिद्ध करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. तसेच १० ते १७ सप्टेंबरदरम्यान प्रत्येक जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्रातील अडचणी दूर करण्यासाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. आतापर्यंत सुमारे ३.५ लाख कुणबी प्रमाणपत्रांचे वितरण झाल्याचेही शासनाने स्पष्ट केले आहे. वंशावळ व कायदेशीर नियमांचे पालन करूनच प्रमाणपत्रे देण्याची भूमिका सरकारने घेतली आहे.



याशिवाय मराठा, कुणबी आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक सवलती, वसतिगृह निर्वाह भत्ता, परदेशी शिक्षणासाठी शिष्यवृत्ती आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण याबाबत चार स्वतंत्र शासन निर्णय जारी करण्यात आले आहेत.

"मराठा समाजाच्या मागण्यांकडे सरकारने दुर्लक्ष केले, असे म्हणणे योग्य नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री विखे पाटील यांनी या प्रश्नावर सातत्याने भूमिका घेतली आहे. घटनात्मक पदांवर असलेल्या आणि ज्येष्ठ नेत्यांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करण्याची भाषा थांबली पाहिजे," असे कोते यांनी स्पष्ट केले.

आम्हालाही जशास तसे उत्तर देता येते

"मराठा समाजाच्या प्रश्नासाठी आम्हीही रस्त्यावर उतरणारे लोक आहोत. त्यामुळे कुणीही आमच्या नेत्यांवर एकेरी भाषेत टीका करीत असेल तर त्याला जशास तसे उत्तर देता येते. मात्र मराठा समाजाला संघर्ष नव्हे, तर आरक्षणाचा ठोस लाभ हवा आहे. म्हणून वातावरण बिघडविण्याऐवजी संवादातून प्रश्न सोडविणे आवश्यक आहे," असे कोते म्हणाले.

फडणवीस सरकारने मराठा समाजाच्या प्रश्नावर घेतलेल्या निर्णयांची जाणीव समाजाला आहे. त्यामुळे सध्या सुरू असलेले आंदोलन नेमके मराठा समाजाच्या आरक्षणासाठी आहे की महायुती सरकारविरोधातील राजकीय संघर्षासाठी, असा प्रश्न सामान्य मराठा समाजामध्ये निर्माण होऊ लागला आहे, असा दावा कोते यांनी केला.

"जरांगे पाटील यांच्या अनेक मागण्यांवर शासनाने सकारात्मक निर्णय घेतले आहेत. सरकारने एक पाऊल पुढे टाकले आहे. आता जरांगे पाटील यांनीही दोन पावले मागे येऊन संवादाचा मार्ग स्वीकारावा. तुटेपर्यंत ताणण्याची भूमिका मराठा समाजाच्या हिताची नाही. नेत्यांवरील एकेरी टीका तातडीने थांबवावी; अन्यथा मराठा समाज आपल्याबरोबर राहणार नाही," असा स्पष्ट इशारा कैलासबापू कोते यांनी दिला.



सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# ग्रामीण भागाला पाणी पुरवठा, आपली नैतिक जबाबदारी - नगराध्यक्षा गीताभाभी पवार

## गेवराई नगर परिषदेची टंचाई बैठक; गेवराई तालुक्यातील विविध भागात

विदारक परिस्थिती निर्माण झाली असून, पाण्याची गरज असतानाकमच, नेमक्या वेळेला पाऊस गायब झाल्याने पाणी टंचाई निर्माण जाणवू लागली आहे. मात्र, गेवराई शहराची गरज लक्षात घेऊन, ग्रामीण भागात पाणी पुरवठा करून, आपण आपली बांधिलकी जोपासून काम करू, त्याच बरोबर, शहरातील नागरिकांनी पाण्याचा जपून वापरा करावा आणि पाणी वाया जाणार नाही, या बाबत दक्षता घ्यावे, असे आवाहन नगराध्यक्षा गीताभाभी बाळराजे पवार यांनी येथे केले आहे.

मंगळवार ता. 8 रोजी सकाळी अकरा वाजता गेवराई नगर परिषदेच्या सभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पाणी टंचाई आढावा बैठकीत त्या बोलत होत्या. यावेळी उपाध्यक्षा रेवतीताई भगवान घुंबार्डे, गटनेते राजेंद्र राक्षसभूवनकर, मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांची उपस्थिती होती.

गेवराई तालुक्यात दोन महिन्यापासून पावसाचा खंड पडल्याने, ऐन पावसाळ्यात अनेक गावांना पाणी टंचाई जाणवू लागली असून, गेवराई नगर परिषदेच्या माध्यमातून टंचाईग्रस्त भागात पाणी देण्याच्या संदर्भात नगर परिषदेची मंगळवारी तातडीने आढावा बैठक झाली. गेवराई शहरातील नागरिकांना अडचण येऊ न देता, ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यासाठी बोलावण्यात आलेल्या टंचाई बैठकीत नगरसेवक, सभापती, अध्यक्ष, उपाध्यक्ष, गटनेते, तसेच नपचे मुख्याधिकारी मांडुरके यांनी भूमिका मांडली. गेवराई शहरातील नागरिकाचे हित लक्षात घेऊन, योग्य नियोजन करण्यात यावे,यावर एकमत झाले.

मागच्या वेळी ग्रामीण भागात टंचाई निर्माण झाली असताना, तत्कालीन आमदार लक्ष्मणराव पवार यांच्या नेतृत्वात नगर परिषदेने रात्रंदिवस नियोजन करून ग्रामीण भागात पाणी पुरवठा करण्यात आला होता. यावर्षी पून्हा टंचाई जाणवू लागल्याने, नगर परिषदेचे पाणी ग्रामीण भागात देण्यात येणार असल्याचे बैठक ठरले आहे. नपच्या सभागृहात दिवंगत आदर्श शिक्षक तथा तत्कालीन शिक्षण सभापती

नारायणराव मोटे यांना श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. बैठकीस नपचे पाणी पुरवठा विभागाचे कर्मचारी यांची उपस्थिती होती. मुख्याधिकारी विक्रम मांडुरके यांनी आभार मानले.

**नगर परिषदेकडे २० लाख लिटर पाणी :** गेवराई नपच्या पाच टाक्यांमधून, ९० लाख लिटर पाणी उपलब्ध होते. त्यापैकी, दर चार दिवसाला ७० लाख लिटर शुद्ध पाणी पुरवठा शहराला केला जातो. शहरात अकरा वार्ड असून, जवळपास एक हजार नळ कनेक्शन आहेत.

२० लाख लिटर पाणी शिल्लक राहते. यातून, शंभर टॅन्कर पाणी ग्रामीण भागातील टंचाईग्रस्त गावांना दिले जाऊ शकते.

# बीड जिल्ह्यात अवैध मद्याविरोधात राज्य उत्पादन शुल्क विभागाची धडक कारवाई




**बीड, दिनांक ९:** जिल्ह्यात अवैध मद्यनिर्मिती, विनापरवाना विक्री आणि चोरटी वाहतूक यांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशान्वये राज्य उत्पादन शुल्क विभागाने संपूर्ण जिल्ह्यात विशेष तपासणी मोहीम राबवली. दिनांक ८ सप्टेंबर २०२६ रोजी दिवसभरात विविध संवेदनशील भागांत अचानक छापे टाकून ११ गुन्हे दाखल करण्यात आले असून, २ वाहनांसह एकूण २ लाख ३० हजार ५१० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीच्या आधारे जिल्ह्यातील विविध तालुक्यांत ही धडक कारवाई करण्यात आली. यामध्ये खालील ठिकाणांचा समावेश आहे.

**गेवराई तालुका:** रोहीतल, तलवाडा, कोमलवाडी, राजपिपरी, बीड तालुका: वाणगाव, कुक्कडगाव, चौसाळा पाटोदा तालुका: पारगाव घुमरा शिवार, अंबाजोगाई तालुका: मंगळवार पेठ (अंबाजोगाई शहर), चनई तांडा,

**कारवाईचा सविस्तर तपशील:** एकूण नोंदवलेले गुन्हे: ११ (सर्व गुन्ह्यांत आरोपी निष्पन्न) जप्त देशी मद्य: ५९.०७ बल्क लिटर जप्त विदेशी मद्य: ११.३४ बल्क लिटर जप्त बीअर: २०.६ बल्क लिटरजप्त हातभट्टी मद्य: १०५ बल्क लिटर

**जप्त वाहने:** २ दुचाकी (अवैध वाहतुकीसाठी वापरलेली)

**एकूण जप्त मुद्देमाल किंमत:** ₹ २,३०,५१०/-

संबंधित सर्व आरोपींविरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी कायदा, १९४९ मधील तरतुदींनुसार गुन्हे दाखल करण्यात आले असून, जप्त वाहनांवर नियमानुसार पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

जिल्ह्यात अवैध हातभट्टी दारू, बनावट मद्यनिर्मिती अथवा चोरटी वाहतूक करणाऱ्यांवर यापुढेही सातत्याने कठोर कारवाई सुरू राहील. नागरिकांच्या परिसरात अवैध मद्यविक्री अथवा निर्मिती होत असल्याचे निदर्शनास आल्यास त्यांनी विभागाशी संपर्क साधावा.

# राज्यात कोरडा दुष्काळ तात्काळ जाहीर करा- रजनीताई पाटील

**केज दि ८(प्रतिनिधी):** राज्यातील अनेक भागांत पावसाने पाठ फिरवल्याने खरीप हंगामातील पिकांची अवस्था अत्यंत गंभीर झाली आहे. पावसाअभावी पिके पूर्णपणे करपून गेली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. त्यामुळे राज्य सरकारने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्यात तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्या तथा काँग्रेसच्या हिमाचल प्रदेशच्या प्रभारी रजनीताई अशोकराव पाटील यांनी केली आहे.



बीड जिल्ह्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण अत्यल्प राहिल्याने सोयाबीन, कापूस, तूर, बाजरी यांसह विविध खरीप पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक शेतकऱ्यांनी मोठा खर्च करून पेरणी केली; मात्र पिकांच्या वाढीच्या काळात आवश्यक पाऊस न झाल्याने संपूर्ण पिके करपून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातात उत्पादन येण्याची शक्यता मावळली असून त्यांच्यावर कर्जाचा बोजा वाढला आहे.

या पार्श्वभूमीवर शासनाने पीकविमा, दुष्काळी अनुदान आणि इतर शासकीय मदत तात्काळ वितरित करावी, अशी मागणी रजनीताई पाटील यांनी केली. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळण्यासाठी पंचनामे करण्याच्या प्रक्रियेत वेळ जाऊ नये. पिकांची परिस्थिती स्पष्टपणे दिसत असताना पंचनामे न करता सरसकट मदत जाहीर करावी, अशी आग्रही भूमिका त्यांनी मांडली. शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत, पीकविम्याची रक्कम, वीजबिलात सवलत आणि कर्जवसुलीस स्थगिती देण्याची गरज आहे. शासनाने प्रशासनाला तातडीने निर्देश देऊन प्रत्यक्ष मदत शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावी. "शेतकरी आज अत्यंत अडचणीत आहे. करपलेली पिके आणि शेतकऱ्यांची अवस्था पाहता कागदी प्रक्रिया न करता शासनाने तातडीने निर्णय घेऊन सरसकट

# आए.एम.ए महिला डॉक्टर विंगच्या वतीने 'माझी मंगळागौर'चे आयोजन

## वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत राहून पारंपरिक संस्कृती जपण्याचा संदेश

अंबाजोगाई (त भा वृत्तसेवा) येथील इंडियन मेडिकल असोसिएशन (आए.एम.ए), योगेश्वरी ब्रँचच्या महिला डॉक्टर विंगच्या वतीने आयोजित करण्यात आलेला माझी मंगळागौर हा पारंपरिक सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. तो उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.




कार्यक्रमाला महिला डॉक्टरांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सदरील कार्यक्रमात इंडियन मेडिकल असोसिएशन (आए.एम.ए), योगेश्वरी ब्रँचच्या महिला डॉक्टर विंगच्या बहुतांश महिला डॉक्टरांनी उत्साहाने सहभाग नोंदवत पारंपरिक खेळ, गाणी, उखाणे तसेच विविध सांस्कृतिक उपक्रमांचा आनंद घेतला. आधुनिक वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत असतानाही आपल्या पारंपरिक संस्कृतीशी असलेली नाळ जपण्याचा सुंदर संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. हा उपक्रम राबविल्याबद्दल कौतुक करून आय.एम.ए चे अध्यक्ष डॉ.राहुल धाकडे यांनी इंडियन मेडिकल असोसिएशन (आए.एम.ए), योगेश्वरी ब्रँचच्या महिला डॉक्टर विंगचे अभिनंदन केले. या कार्यक्रमात डॉ.मनिषा पवार, डॉ.राजश्री धाकडे, डॉ.अर्चना थोरात, डॉ.अरूणा केंद्रे, डॉ.जिगिषा मरवाळे (मुळे), डॉ.स्मिता दामा, डॉ.आशा जुने, डॉ.सुनिता तोंडगे, डॉ.प्रिती चाफेकर, डॉ.दिपाली बर्दापूरकर, डॉ.शुभदा लोहिया, डॉ.सुनिता शेटे, डॉ.मनिषा फड, डॉ.रूपाली धर्मपात्रे, सौ.प्रिया विनोद जोशी, डॉ.सृष्टी गुळभिले, सौ.सारीका घुगे, डॉ.पुनम दिपक पाटील, डॉ.स्मिता चौधरी, डॉ.साधना यादव, डॉ.मंगला बाहेती यांच्यासह आय.एम.ए महिला डॉक्टर विंगच्या सदस्य आणि पुरूष सदस्यांच्या अर्धांगिनी यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला होता. सदरील कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इंडियन मेडिकल असोसिएशन (आए.एम.ए), योगेश्वरी ब्रँचच्या महिला डॉक्टर विंगच्या अध्यक्षा डॉ.मनिषा पवार आणि सचिव डॉ.जिगिषा मरवाळे (मुळे) यांनी विशेष परिश्रम घेतले. त्यांच्या नियोजनातून व सहकार्याने कार्यक्रम आनंददायी आणि संस्मरणीय ठरला. महिला डॉक्टरांना दैनंदिन व्यावसायिक धावपळीतून विरंगुळा मिळावा, परस्परांमध्ये स्नेहभाव व आपुलकीचे नाते अधिक दृढ व्हावे आणि सांस्कृतिक परंपरांचे जतन व्हावे, या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

# शब्दधन सोशल फाउंडेशन बारामतीच्या वतीने आदर्श शिक्षक भागवत मसने सन्मानित

**अंबाजोगाई :** शिक्षक दिनाचे औचित्य साधत शब्दधन सोशल फाउंडेशन बारामती च्या वतीने येथील योगेश्वरी विद्यालयातील आदर्श शिक्षक, सुप्रसिद्ध कवी, वात्रटिकाकार भागवत (बी आर) मसने यांना राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सुपर तीस राज्यस्तरीय गुणवंत शिक्षक पुरस्कार शब्दधन सोशल फाउंडेशन बारामतीच्या वतीने हा पुरस्कार सोहळा बारामती शहरामध्ये आयोजित करण्यात आला होता. भागवत मसने यांना हा पुरस्कार प्राचार्य देशमुख, प्राचार्य शिंदे, तसेच नगरसेविका धनश्री बांदल यांच्या उपस्थितीमध्ये वितरित करण्यात




आला. याअगोदर भागवत मसने यांना बीड, कोल्हापूर, पुणे येथील विविध सामाजिक, सांस्कृतिक तसेच शैक्षणिक संघटना कडून आदर्श शिक्षक, उत्कृष्ट साहित्यिक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.

बारामती येथील शब्दधन सोशल फाउंडेशन हे अत्यंत प्रतिष्ठित असे सामाजिक तथा सांस्कृतिक संघटन आहे. हे संघटन आपल्या भागासोबतच संपूर्ण महाराष्ट्रात विविध समाजिक सेवा देत आहे. आपले कार्य करतांना समाजातील गुणिजनांना हेरून त्यांचा मान सन्मान करून त्यांच्या पाठीवर कौतुकाची थाप देत आहे. डॉ सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या जयंतीनिमित्त म्हणजेच शिक्षक दिनाचे औचित्य साधून राज्यात विविध ठिकाणी ज्ञानदान करणाऱ्या गुणवंत शिक्षकांचा सन्मान केला . यामध्ये अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी शिक्षण संस्थेत ज्ञानार्जन करणारे भागवत उर्फ बी आर मसने यांना फाउंडेशनच्या वतीने सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी प्राचार्य देशमुख तथा प्राचार्य शिंदे यांनी भागवत मसने यांनी शैक्षणिक क्षेत्रासोबतच सामाजिक तथा सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या कार्याचा उहापोह करत त्यांचे अभिनंदन केले.योगेश्वरी शिक्षण संस्थेत भागवत मसने हे मागील तीस वर्षे अध्यापनाचे पवित्र असे कार्य करत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत शेकडो विद्यार्थी सामाजिक तथा शैक्षणिक क्षेत्रासोबतच अन्य क्षेत्रात आपली वेगळी ओळख निर्माण करून आहेत. मसने यांनी स्वलिखित विविध एकांकिका, वक्तृत्व वादविवाद स्पर्धा, पथनाट्य, समूहगीते, पोवाडे आदी कला प्रकारात विद्यार्थ्यांना बहुमोल मार्गदर्शन करून त्यांचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यासोबतच विविध महाविद्यालयाचे स्नेहसंमेलन, एन एस.एस. शिबिरे, पदवीप्रदान कार्यक्रम, निरोप समारंभ आदी कार्यक्रमातून सामाजिक व राजकीय व्यंगाच्या द्वारे विद्यार्थ्यांना व समाजाला मार्गदर्शन केले आले. राजकीय तथा सामाजिक वात्रटिका लिहून त्या अत्यंत मिश्किल पद्धतीने सादर करून प्रेक्षकांना हसवत हसवतच अनेक प्रश्नांची उकल करून देत प्रेक्षकांची मने जिंकली आहेत.बालविवाह, प्रौढ साक्षरता, सेवा हमी कायदा, पर्यावरण, शेतकऱ्यांचे प्रश्न आदी सामाजिक प्रश्नांवर विविध पथनाट्य,एकांकिका स्वतः लिहून विद्यार्थ्यांमार्फत स्वतः दिग्दर्शन करून सादर केलेल्या आहेत. आकाशवाणी बीड येथे देखील एकांकिका सादर केलेल्या आहेत. नुकताच त्यांचा आकाशवाणी बीड येथे कवितांचा कार्यक्रम रेकॉर्ड करण्यात आला. येत्या काही दिवसातच तो प्रसारित देखील होणार आहे.

# आज केज येथे स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल मध्ये तालुकास्तरीय शालेय बुद्धिबळ स्पर्धा संपन्न




केज /प्रतिनिधी

स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूल येथे तालुकास्तरीय बुध्दीबळ स्पर्धाचे आयोजन करण्यात आले होते या स्पर्धेचे उद्घाटन शाळेचे अध्यक्ष श्री. अंकुशराव इंगळे यांच्या हस्ते संपन्न झाले या कार्यक्रमाला अध्यक्षा म्हणून श्रीमती राखी यादव मॅडम तालुका क्रीडा अधिकारी उपस्थित होत्या. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी श्री.डॉ.वासुदेव नेहरकर व शाळेचे मुख्याध्पाक श्री.गणेश कोकीळ यांच्या उपस्थितीत संपन्न झाले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक श्री. विनोद गुंड सर यांनी केले या कार्यकामाचे प्रमुख अतिथी यांचे स्वागत श्री. विनोद गुंड सर व स्वंराजली मॅडम यांनी केले. या कार्यक्रमाला मार्गदर्शन श्री. श्री. अंकुशराव इंगळे व डॉ नेहरकर सर यांनी केले या वेळी क्रीडाश्रेत्राविषयी व बुद्धिबळ खेळाविषयी खेळाडूना महिती दिली या या स्पर्धाला प्रमुख क्रीडा शिक्षक , गिरी सर व घोळवे सर सारूक सर यांनी पंच म्हणून काम पाहिले. या स्पर्धेला , श्री. तोंडसे सर ,श्रीमती बोबडे मॅडम, श्री. राऊत सर केंद्रे मॅडम, मॅडम श्रीमती कादरी मॅडम श्री.साखरे सर, वायभट सर, जाधव सर अक्षय सर डोईफोडे सर उपस्थित होते यांचा सत्कार श्री विनोद गुंड सर यांनी केला या स्पर्धेला तालुक्यातील अनेक शाळेतील खेळाडूनी सहभाग नोंदवला या कार्यक्रमाला शाळाचे शिक्षक, शिक्षका, शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# 'स्वाराती' ला 40 कोटींचा निधी : वर्ग –3 निवासस्थान, मुलींचे वसतिगृह व 'ओपीडी' इमारतीच्या बांधकामाला मंजुरी

**अंबाजोगाई :** स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या विविध विकासकामांना मोठी गती मिळणार आहे. केंद्र शासनाच्या 'राज्यांना भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य' योजनेंतर्गत अंबाजोगाईच्या 'स्वाराती' साठी तब्बल 42 कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली असून त्यापैकी 40 कोटी रुपयांचा निधी वितरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

महाराष्ट्र शासनाच्या वैद्यकीय शिक्षण विभागाने 4 सप्टेंबर 2026 रोजी याबाबत शासन निर्णय जारी केला आहे. या निधीतून 'स्वाराती' परिसरात वर्ग - 3 कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्यासाठी 25 कोटी रुपये, 160 मुलींच्या वसतिगृहाच्या दुसऱ्या मजल्यासाठी 5 कोटी रुपये, तर 'ओपीडी' इमारतीच्या उर्वरित बांधकामासाठी आणखी 10 कोटी रुपये उपलब्ध होणार आहेत.

गेल्या काही काळापासून 'स्वाराती' मध्ये पायाभूत सुविधांच्या प्रश्नांवर सातत्याने चर्चा होत आहे. अशा परिस्थितीत शासनाकडून मिळालेला हा निधी रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या विकासासाठी महत्त्वाचा मानला जात आहे. या कामांना गती मिळाल्यास विद्यार्थ्यांसह रुग्ण, डॉक्टर व कर्मचाऱ्यांना मोठा दिलासा मिळण्याची शक्यता आहे. 'स्वाराती' च्या विकासासाठी मंजूर झालेला हा निधी प्रत्यक्षात किती वेगाने खर्च होतो आणि कामे दर्जेदार पद्धतीने पूर्ण होतात का ?, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

# नमो उद्यानाचे काम रखडले; 15 दिवसांत काम सुरु न झाल्यास आंदोलन -विनोद लड्डा



**माजलगाव:** माजलगाव (बीड) - माजलगाव शहरासाठी मंजूर असलेल्या नमो उद्यानाचे काम अद्यापही सुरू न झाल्याने नागरिकांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. बजेट मंजूर होऊनही प्रशासनाच्या दिरंगाईमुळे काम रखडले असून, येत्या पंधरा दिवसांत कामाला सुरुवात न झाल्यास प्रभागातील सर्वसामान्य जनता आणि मतदारांना सोबत घेऊन तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा भारतीय जनता पार्टीचे माजलगाव शहर उपाध्यक्ष विनोद लड्डा यांनी दिला आहे.

आज माजलगाव नगरपरिषद येथे मुख्याधिकारी विशाल बालवडकर यांची भेट घेऊन लड्डा यांनी यासंदर्भात निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी नमूद केले की, नमो उद्यानासाठी निधी उपलब्ध होऊनही प्रत्यक्ष कामाला सुरुवात झालेली नाही. शहराच्या सौंदर्यीकरण आणि नागरिकांच्या विरंगुळ्यासाठी महत्त्वाचा असलेला हा प्रकल्प विनाकारण प्रलंबित ठेवला जात आहे.

"प्रशासनाने तात्काळ याची दखल घेऊन काम सुरू करावे. पंधरा दिवसांत कार्यवाही न झाल्यास लोकशाही मार्गाने आंदोलन करण्यात येईल, याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनाची राहील," असे विनोद लड्डा यांनी निवेदनात म्हटले आहे.

# दिमाखदार सोहळ्यात श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या भव्य इमारतीचे उद्घाटन!

**किल्ले धारूर (प्रतिनिधी):** गुणवत्तापूर्ण शिक्षण आणि संस्कारांची प्रदीर्घ परंपरा जपणाऱ्या श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल अँड ज्युनियर कॉलेजच्या नूतन, भव्य व सुसज्ज इमारतीचा दिमाखदार उद्घाटन सोहळा मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी अत्यंत उत्साहपूर्ण आणि मंगलमय वातावरणात संपन्न झाला. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण देण्याच्या ध्येयाने उभारलेली ही नवी वास्तू किल्ले धारूरच्या शैक्षणिक वाटचालीत एक महत्त्वपूर्ण व ऐतिहासिक मैलाचा दगड ठरली आहे.

कार्यक्रमाची सुरुवात उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते दीपप्रज्वलन आणि मा सरस्वतीच्या पूजनाने झाली. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते फित कापून नवीन इमारतीचे विधिवत उद्घाटन करण्यात आले. नव्या इमारतीमध्ये प्रशस्त व हवेशीर वर्गखोल्या, डिजिटल ई-लर्निंग सुविधा, अद्ययावत विज्ञान व गणित प्रयोगशाळा, समृद्ध संगणक कक्ष आणि भव्य ग्रंथालय यांसारख्या विविध आधुनिक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या सर्व सुविधांमुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाला मोठी गती मिळणार आहे.

याप्रसंगी बोलताना संस्थेचे संस्थापक अध्यक्ष माननीय श्री. बाळासाहेब राठोड सर यांनी अत्यंत भावुक व प्रेरणादायी मनोगत व्यक्त केले. "ही नवी इमारत म्हणजे केवळ सिमेंट आणि विटांची वास्तू नसून, विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्याची पायाभरणी करणारे पवित्र ज्ञानमंदिर आहे. विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षणासोबतच उच्च संस्कार, शिस्त आणि जीवनकौशल्ये देऊन सक्षम नागरिक बनवणे हाच आमचा खरा संकल्प आहे," असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून लाभलेले धारूर नगरीचे नगराध्यक्ष श्री. बालासाहेब जाधव सर, माजी नगराध्यक्ष श्री. अर्जुनजी गायकवाड सर, माजी नगराध्यक्ष श्री. माधव तात्या निर्मळ, नगरसेवक अक्रम भैया जरगर तसेच पत्रकार बांधवांच्या वतीने श्री. सूर्यकांत जगताप यांनी संस्थेच्या शैक्षणिक कार्याचा गौरव केला.

विशेष वसुली अधिकारी अंबाजोगाई यांचे कार्यालय,
व्दारा, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई
मुख्य कार्यालय, दीनदयाळ भवन, अंबाजोगाई, जि.बीड.
जा.क्र.दीन/वि.वसुली /८/७००२-१२०/जप्ती /१५८/२०२६-२७
दिनांक :- १०.०९.२०२६

**स्थावर मालमत्तेच्या जप्तीची उदघोषणा**

ज्याअर्थी, दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई, शाखा:- उदगीर (धनको)यांनी यांनी मे. अष्टविनायक कलेक्शन प्रोप्रा.रामलिंग शंकरअप्पा रेगुडेस्वामी व इतर यांच्या विरुध्द रु.३,३४,२८१/- व दि.०१.१०.२०२३ पासुनचे द.सा.द.शे.११.८५% प्रमाणे होणा-या (व्याजासह) रक्कमे बद्दल, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० यांच्या कलम १०१ अन्वये मा.उपनिबंधक,सहकारी संस्था (परसेवा) मराठवाडा अर्बन को-ऑप.असोसिएशन लि.औरंगाबाद यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम १०१ अन्वये वसुली प्रमाणपत्र आदेश किंवा त्यांचे आदेश मिळविले असुन उक्त निर्णित ऋणकोची पुढील मालमत्ता विकून त्याची अंमलबजावणी करण्याचा विचार आहे आणि ज्याअर्थी,उक्त निर्णित धनकोने उक्त अधिनियमाच्या कलम १०१ अन्वये निवाड्याची किंवा आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी दावा क्र. १३५७/२०२३-२४/१५६/२०२४ दि.३०/०४/२०२४ रोजीचे प्रमाणपत्र मिळवलेले आहे व सदर प्रकरणी अंतिम डिमांड नोटीस दिनांक १३.०६.२०२५ रोजी देण्यात आलेली आहे.

ज्याअर्थी, याद्वारे अशी नोटीस देण्यात येते की, असे प्रमाणपत्र दिल्यानंतर बँकेकडील थकबाकी वसुलीसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० चे कलम १५६ व नियम १९६१ चे नियम १०७(१०) प्रमाणे थकबाकीदाराच्या नावापुढे नमूद केलेल्या त्यांच्या मालकी वहिवाटीच्या स्थावर मिळकती जप्ती आदेशाने जप्त करण्यात येत असुन (जसे आहे तसे, जिथे आहे तेथे) सदर मालमत्तेचा प्रतिकात्मक (सिंबॉलिक) ताबा घेण्यात येत आहे.,तसेच महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम,१९६० मधील तरतूदीनूसार या जप्तीच्या आदेशानंतर सदर स्थावर मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे खाजगीरीत्या तबदिल करणे,तीवर बोजा नोद करणे,बक्षीस देणे,हस्तांतर करणे यास मनाई करण्यात येत आहे. तरी सदर खाली नमूद केलेल्या थकबाकीदारांचे स्थावर मिळकतीशी कोणत्याही प्रकारचे कसलेही व्यवहार अगर बोजे नोंद करण्यात आले असतील तर त्या गोष्टी उपरोक्त अधिनियमाच्या कलम ९९ अन्वये निर्णित धनकोविरुध्द रद्द व निरर्थक होतील व ते आमच्या बँकेवर बंधनकारक राहणार नाही.

**स्थावर मिळकतीचे वर्णन**

| हुकुमनाम्याचा व प्रमाणपत्राचा दिनांक व तारण गहाण खताचा तपशील | ज्या पक्षकाराच्या विरुध्द हुकुम नामा देण्यात आला असेल त्या पक्षकाराचे नाव | भुमापन क्र. किंवा घर क्र. | गाव किंवा शहराचे नाव | क्षेत्रफळ | आकारणी | सिमा |
|---|---|---|---|---|---|---|
| दावा क्र ऊनि /वसुली प्रक १३५७/२०२३-२४/१५५/२०२४ दिनांक ३०/०४/२०२४ व गहाण खत क्र. १७८/२०२२ दिनांक ०७/०१/२०२२ | १. १. मे अष्टविनायक कलेक्शन प्रो रामलिंग शंकरअप्पा रेगुडेस्वामी<br>२. श्री दत्तात्रय सूर्यकांत सुवर्णकार<br>३. श्री ईश्वर शरणअप्पा अष्टूरे<br>४. श्री गुरुप्रसाद रामलिंग मोदी | गट नं.१०७ | मु. पो. तोंडचिर. ता. उदगीर, जि. लातूर, | क्षेत्रफळ ०० हेक्टर ७४ आर | - | **पूर्वस**:श्री मन्मथ अप्पा स्वामी यांची जमीन,<br>**पश्चिम** :श्री उमाकांत स्वामी यांची जमीन,<br>**दक्षिण** : श्री श्री अप्पराव पाटील यांची जमीन,<br>**उत्तर** : बंडेप्पा शंकरप्पा व ईतर यांची जमीन. |

**टिप-१. तफावत आल्यास बँकेच्या मुळ दस्ताप्रमाणे ग्राहय धरण्यात येईल.**
**२. अज्ञात बोजे ज्ञात नाहीत.**

**नोटः-**
१. सदर नोटीस प्राप्त होताच आपण ३० दिवसाच्या आत आपल्याकडील थकबाकी भरावी, अन्यथा सदर मालमत्ता लिलावाद्वारे विक्री करण्यात येईल याची नोंद घ्यावी.
२. वरिल जप्त स्थावर मिळकतीबाबत ज्या कोणास खरेदी व्यवहार करावयाचा असेल तर त्यांनी बँकेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी/विशेष वसुली अधिकारी यांचेशी संपर्क साधावा.
३. याची एक प्रत सहकर्जदार / जामीनदार १. श्री दत्तात्रय सूर्यकांत सुवर्णकार २. श्री ईश्वर शरणअप्पा अष्टूरे ३. श्री गुरुप्रसाद रामलिंग मोदी यांना देऊन कळविण्यात येते की, आपली देखील स्थावर /जंगम मालमत्ता जप्तीची कारवाई होऊ शकते याची नोंद घ्यावी.
४. याची एक प्रत मा.जिल्हाधिकारी/मा.तहसिलदार/मा.मुख्याधिकारी/मा.गावकामगार तलाठी/मा.ग्रामसेवक/मा.तालुका निरीक्षक भुमी अभिलेख यांना माहितीस्तव व योग्य त्या कार्यवाहीस्तव.

**दिनांक – १०.०९.२०२६**
**ठिकाण - मु.पो.तोंडचिर ता.उदगीर,जि.लातुर**

**विशेष वसुली व विक्री अधिकारी**
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म.अंबाजोगाई

# सात वर्षांत एमजीएम विद्यापीठाची गुणवत्तापूर्ण भरारी

## 300 हून अधिक अभ्यासक्रमांत सुमारे १० हजार विद्यार्थी; सोलापूर विद्यापीठासोबत सामंजस्य करार

तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** बहुविद्याशाखीय आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणासह संशोधन, कौशल्य विकास व उद्योजकतेला चालना देत महात्मा गांधी मिशन विद्यापीठाने सात वर्षांत शिक्षण क्षेत्रात आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. विद्यापीठाच्या सातव्या वर्धापन दिनानिमित्त बुधवारी रुक्मिणी सभागृहात आयोजित सोहळ्यात विद्यापीठाच्या वाटचालीचा आढावा घेण्यात आला. यावेळी विविध पुस्तकांसह 'एमजीएम अभिव्यक्ती २०२६' या वार्तापत्राचे आणि विद्यार्थ्यांच्या 'एमजीएम इस्पायर' अंकाचे प्रकाशन करण्यात आले. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठासोबत सामंजस्य करार करण्यात आला.

कार्यक्रमाला टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेसचे कुलगुरू प्रा. बद्री नारायण तिवारी प्रमुख अतिथी म्हणून दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवार सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित होते. एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव, कुलपती अंकुशराव कदम, शिक्षणतज्ज्ञ भाऊसाहेब राजळे, कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांच्यासह अधिष्ठाता, प्राध्यापक, विद्यार्थी व एमजीएम परिवारातील सदस्यांची उपस्थिती होती.

विद्यापीठाच्या सात वर्षांच्या वाटचालीवर आधारित माहितीपट यावेळी सादर करण्यात आला. विद्यापीठातील प्राध्यापकांनी लिहिलेल्या पुस्तकांचे, 'एमजीएम अभिव्यक्ती २०२६'



या वार्तापत्राचे तसेच कॉलेज ऑफ कम्युनिकेशन, कल्चर अँड मीडियाच्या विद्यार्थ्यांच्या 'एमजीएम इस्पायर' अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते झाले. उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विद्यार्थी व संबंधितांचा सन्मानही करण्यात आला.

यावेळी सेल्सफोर्स सेंटर ऑफ एक्सलन्स, स्कूल ऑफ इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजीच्या वातावरणातील आर्द्रतेपासून पाणी निर्मिती करणाऱ्या यंत्रणेचे आणि फिनिशिंग स्कूलचे उद्घाटन करण्यात आले. एमजीएम विद्यापीठ आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ यांच्यात झालेल्या सामंजस्य करारावर एमजीएमचे कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर आणि सोलापूर विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. अतुल लकडे यांनी स्वाक्षऱ्या केल्या.

सात विद्याशाखा, ३०० हून अधिक अभ्यासक्रम

कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी विद्यापीठाच्या प्रगतीचा आढावा घेताना सांगितले की, सध्या सात विद्याशाखांच्या माध्यमातून ३०० हून अधिक अभ्यासक्रम सुरू असून सुमारे १० हजार विद्यार्थी विविध ज्ञानशाखांमध्ये शिक्षण घेत आहेत. आतापर्यंत चार दीक्षांत समारंभ यशस्वीपणे पार पडले आहेत. विद्यार्थ्यांना केवळ पदवीचे शिक्षण न देता त्यांच्या ज्ञान, कौशल्य आणि क्षमतांना योग्य दिशा देण्याचे काम विद्यापीठ सातत्याने करीत असल्याचे त्यांनी सांगितले.

**संशोधन समाजोपयोगी ठरावे : डॉ. जाधव**

एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ. पी. एम. जाधव यांनी विद्यापीठाने राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय संस्थांशी केलेल्या सामंजस्य करारांचा प्रत्यक्ष लाभ विद्यार्थी आणि समाजाला मिळणे महत्त्वाचे असल्याचे सांगितले. केवळ पेटंटची संख्या वाढविण्यापेक्षा संशोधनाचा समाजाला प्रत्यक्ष उपयोग झाला पाहिजे. शिक्षकांनीही सातत्याने वाचन व अध्ययन करून ज्ञानवृद्धी करावी, असे आवाहन त्यांनी केले.

कुलगुरू प्रा. डॉ. विलास सपकाळ यांनी विद्यार्थ्यांनी बहुविद्याशाखीय शिक्षणातून विविध ज्ञानशाखांचा परिचय करून घ्यावा, असे सांगितले. भाषा, व्यावसायिक कौशल्ये आणि कार्यसंस्कृती विकसित करण्यासोबतच शिक्षण पूर्ण होण्याची वाट न पाहता आपल्या कल्पनांवर काम सुरू करावे. तंत्रज्ञानाची जोड देऊन विद्यार्थी स्वतःचे उद्योग व नवउपक्रम उभारू शकतात, असे त्यांनी नमूद केले.

प्रा. बद्री नारायण तिवारी यांनी एमजीएम विद्यापीठाच्या सात वर्षांच्या वाटचालीचे कौतुक करताना गांधीवादी मूल्ये, हरित परिसर आणि समाजाशी जोडलेले शिक्षण ही विद्यापीठाची वैशिष्ट्ये असल्याचे सांगितले. विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष अनुभवातून शिकून सामाजिक समस्या सोडविण्यासाठी ज्ञानाचा उपयोग करावा, असे आवाहन त्यांनी केले. डॉ. प्रकाश महानवार यांनी एमजीएम विद्यापीठाची बहुविद्याशाखीय व गुणवत्तापूर्ण वाटचाल कौतुकास्पद असल्याचे सांगत विद्यापीठाचा विस्तार भविष्यात मोठ्या वटवृक्षाप्रमाणे होईल, असा विश्वास व्यक्त केला. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांसाठी बहुविद्याशाखीय शिक्षण, कौशल्य विकास आणि उद्योजकतेच्या नव्या संधी उपलब्ध होत असल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कुलसचिव डॉ. आशिष गाडेकर यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. भक्ती बनवसकर यांनी केले, तर उपकुलसचिव प्रा. डॉ. परमिंदर कौर धिंग्रा यांनी आभार मानले. विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि राष्ट्रगीताने सांगता झाली.

## 18 एमएमटी ची नवीन क्षमता वाढवणार

**छत्रपती संभाजीनगर:** भारतातील सर्वात मोठ्या आणि जगातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या इंटिग्रेटेड ट्रान्सपोर्ट ऑपरेटर्सपैकी एक असलेली एपीएसईझेड ओडिशातील पारादीप बंदरावरील दोन ड्राय बल्क बर्थच्या विकास आणि संचालनासाठी सर्वाधिक बोली लावणारी कंपनी ठरली आहे. कंपनीला यासाठी लेटर ऑफ अवॉर्ड (LoA) प्राप्त झाले आहे.18 मिलियन मेट्रिक टन (एमएमटी) इतकी नवीन क्षमता जोडली जाणार असून, त्यामुळे एपीएसईझेड च्या एकूण पोर्टफोलिओची क्षमता वाढून 671 एमएमटीपीए होईल. या विस्तारामुळे 2030 पर्यंत 1 अब्ज टन कार्गो हाताळणी क्षमता गाठण्याच्या कंपनीच्या उद्दिष्टाला पुढे नेण्यास मदत होईल.

## फर्स्ट-एव्हर बीएमडब्ल्यू आय 5 लाँग व्हीलबेस लाँच

छत्रपती संभाजीनगर - बीएमडब्ल्यू इंडियाने देशात फर्स्ट-एव्हर एमडब्ल्यू आय 5 लाँग व्हीलबेस लाँच केली आहे. ही कार भारतभरातील बीएमडब्ल्यू डीलरशिप्सकडे बुक करता येईल. फर्स्ट-एव्हर i5 लाँग व्हीलबेसचे आता बीएमडब्ल्यू ग्रुपच्या चेन्नई येथील प्लांटमध्ये स्थानिक पातळीवर उत्पादन केले जाणार असून, तिच्या डिलिव्हरीज लवकरच सुरु होणार आहेत. श्री. हरदीप सिंग ब्रार, बीएमडब्ल्यू ग्रुप इंडियाचे प्रेसिडेंट आणि सीईओ म्हणाले, "फर्स्ट-एव्हर एमडब्ल्यू आय 5 लाँग व्हीलबेसची प्रस्तुती आमच्या प्रवासातील एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. यामुळे भारतासाठी विशेषतः तयार करण्यात येणाऱ्या लाँग व्हीलबेस आणि इलेक्ट्रिक वाहनांच्या धोरणाला अधिक बळकटी मिळते. आमची स्थानिक पातळीवर उत्पादित होणारी पहिली इलेक्ट्रिक सेडान म्हणून, ही कार आमच्या वाढत्या स्थानिक उत्पादन क्षमतेचे दर्शन घडवते आणि सस्टेनेबल मोबिलिटी क्षेत्रातील आमचे नेतृत्व अधिक दृढ करते.

## आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी नवकल्पनांचा शुभारंभ केला

**छत्रपती संभाजीनगर :** वित्त मंत्रालय, भारत सरकारच्या वित्तीय सेवा विभागाचे सचिव, श्री. संजय लोहिया यांनी आज देशातील आर्थिक समावेशनाला चालना देण्यासाठी ग्लोबल फिनटेक फेस्ट 2026 मध्ये अनेक नवकल्पनांचा शुभारंभ केला. या उपक्रमांमध्ये त्वरित रुपे कार्ड आणि व्यापाऱ्यांसाठी यूपीआय क्यूआर जारी करण्यासाठी ओपन-सोर्स एटीएम, निवडक सरकारी समर्थित कर्ज योजनांसाठी 'युपीआय वरील क्रेडिट लाइन'ची सुविधा, तसेच आधार सक्षम पेमेंट प्रणाली थ्री-पार्टी कॅश डिपॉझिट या सुविधांचा समावेश आहे. हा कार्यक्रम भारतीय विशिष्ट ओळख प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी , श्री. सौरभ विजय यांच्या उपस्थितीत पार पडला. रुपे कार्ड आणि व्यापारीक्यूआर जारी करण्यासाठी ओपन-सोर्स एटीएम या सुविधेमुळे ग्राहकांना एटीएमद्वारे सोप्या स्व-सेवा प्रक्रियेत वैयक्तिकृत रुपे डेबिट, क्रेडिट आणि एनसीएमसी कार्डे त्वरित प्राप्त करता येतील. हे ओपन-सोर्स एटीएम यूपीआय-आधारित पेमेंट स्वीकारण्यासाठी व्यापाऱ्यांना क्यूआर कोडही उपलब्ध करून देईल, ज्यामुळे व्यापाऱ्यांना क्यूआर कोड सहजपणे तैनात करून पेमेंट स्वीकारणे सुरू करता येईल. याशिवाय, या एटीएमद्वारे धनादेश जमा करणे, खाते उघडणे आणि कर्जासाठी अर्ज करणे यांसारख्या बँकिंग सेवाही उपलब्ध करून दिल्या जातील.

## 'जंगल टेल्स विथ मोगली' 12 सप्टेंबरपासून जिओहॉटस्टार आणि डिस्ने चॅनेलवर

**मुंबई, 10 सप्टेंबर 2026:** जिओस्टारच्या किड्स अँड फॅमिली पोर्टफोलिओने आपल्या नव्या शीर्षक *'जंगल टेल्स विथ मोगली'*द्वारे सर्वांच्या लाडक्या मोगलीला नव्या रूपात प्रेक्षकांसमोर आणले आहे. प्रसिद्ध कथेवर आधारित ही मालिका स्लॅपस्टिक कॉमेडीने भरलेली असून, मजा आणि जुन्या आठवणींचा सुंदर मिलाफ घडवते. 12 सप्टेंबर 2026 रोजी दुपारी 2 वाजता ही मालिका जिओहॉटस्टार आणि डिस्ने चॅनेलवर प्रीमियर होणार आहे. 10 वर्षांचा जिज्ञासू आणि खट्याळ मोगली हा या मालिकेचा केंद्रबिंदू आहे. जंगलातील त्याच्या आगळ्यावेगळ्या साहसांमध्ये तो अनेकदा अडचणीत सापडतो आणि त्यातून विनोदी प्रसंग घडतात. परिस्थितीजन्य विनोद, स्लॅपस्टिक कॉमेडी आणि मिश्कील संवादांनी सजलेली ही मालिका बालू आणि बघीरा यांसारख्या मोगलीच्या मित्रांना, तसेच शेरखान, का आणि तबाकी यांसारख्या त्याच्या प्रतिस्पर्ध्यांनाही पुन्हा भेटण्याची संधी देईल. हे पात्र पालकांच्या बालपणीच्या आठवणी ताज्या करतील, तर मुलांना प्रथमच या अविस्मरणीय पात्रांची ओळख करून देतील.

## एसबीआय लाईफकडून गौरव

**नवी दिल्ली:** पदक जिंकल्यानंतर सारं जग त्या विजयाच्या क्षणाचा साक्षीदार होतं; मात्र त्या पदकामागील प्रवासासाठी अनेक वर्षे लागलेली असतात. त्यासाठी सुरुवात करण्याचे धैर्य, पुढे वाटचाल सुरू ठेवण्याची जिद्द, अडथळ्यांवर मात करण्याचा आत्मविश्वास आणि अनेकदा कुटुंबीय, प्रशिक्षक व आप्तस्वकीयांचा मूक पाठिंबा आवश्यक असतो. जगाला व्यासपीठावर त्या आकांक्षेचे दर्शन होण्याच्या कितीतरी आधीपासून तिच्या पाठीशी ते ठामपणे उभे असतात. ग्लासगो 2026 राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये भारताने केलेल्या उल्लेखनीय कामगिरीमागील या कहाण्यांची दखल घेत, एसबीआय लाईफ इन्श्युरन्सने पॅरालिम्पिक कमिटी ऑफ इंडिया (PCI) सोबत भारतासाठी तीन सुवर्ण, दोन रौप्य आणि दोन कांस्य अशी सात पदके घेऊन आलेल्या भारतीय पॅरा-क्रीडापटूंचा सत्कार केला.

# बायपास रस्ता, प्राधिकरणातून वगळणे व टोलनाका हटविण्याच्या मागणीसाठी बिडकीन येथे रास्ता रोको



तभा वृत्तसेवा

**बिडकीन, दि. १० सप्टेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथील बायपास रस्ता, महानगर प्राधिकरणातून बिडकीनला वगळणे तसेच टोलनाका हटविण्यात यावा, या विविध मागण्यांसाठी बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता निलजगाव फाटा येथे बिडकीन सर्वपक्षीय पदाधिकारी व ग्रामस्थांच्या वतीने तीव्र रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. सुमारे चार तास हे आंदोलन सुरू होते. या विविध मागण्यांचे निवेदन राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी अनिकेत कुलकर्णी, प्राधिकरणाचे अधिकारी साटोटो व उपायुक्त चव्हाण यांना ग्रामस्थांच्या वतीने देण्यात आले. या आंदोलनात रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट)चे सचिव अमोल नरवडे, जिल्हा परिषद सदस्य मनोज पेरे, सरपंच अशोक धर्मे, उपसरपंच किरण गुजर, पंचायत समिती सदस्य अक्षय गवारे, काकासाहेब टेके, मधुकर सोकटकर, विकास गोर्डे, हसन चाऊस, कृष्णा चौथमल, प्रकाश जैस्वाल, दिलीप देवळाणकर, राजू वैद्य, सागर फरताळे, डॉ. गणेश शिंदे, सुनील धुत यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ सहभागी झाले होते. दरम्यान, आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर निलजगाव फाटा परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी सहाय्यक पोलीस निरीक्षक निलेश शेळके यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

# सिडको जैन मंदिरात मानस्तंभ जीर्णोद्धाराचा शिलान्यास चार हत्ती, चार इंद्रांच्या कलाकुसरीसह उभारणार भव्य मानस्तंभ



तभा वृत्तसेवा

**छत्रपती संभाजीनगर :** सिडको एन-९ येथील श्री १००८ कलिकुंड पार्श्वनाथ सैतवाल दिगंबर जैन मंदिरात मानस्तंभ जीर्णोद्धाराचा शिलान्यास सोहळा उत्साहात पार पडला. आचार्य पवित्र सागर महाराज, मुनिश्री प्रशांत सागर महाराज व मुनिश्री प्रभाव सागर महाराज यांच्या आशीर्वादाने आणि आचार्य श्री १०८ सुयशगुप्ती महाराज यांच्या सान्निध्यात हा कार्यक्रम झाला.

यावेळी आचार्य सुयशगुप्ती महाराज यांनी प्रवचनातून मानस्तंभाचे धार्मिक महत्त्व विशद केले. पांढऱ्या जयपुरी आगरा मार्बलमध्ये हा मानस्तंभ उभारण्यात येणार असून, त्याचा पाया काळ्या दगडात करण्यात येणार आहे. चारही दिशांना चार हत्ती, चार इंद्र तसेच आकर्षक नक्षीकाम असलेला हा मानस्तंभ संपूर्ण महाराष्ट्रात वैशिष्ट्यपूर्ण ठरणार आहे. त्याचे आयुष्य सुमारे ५०० वर्षे राहणार असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यासाठी कैलासजी बाळशेट्टी व बाळशेट्टी परिवार, प्रकाशजी भाकरे, सुमनताई सांगोले, प्रज्ञा देशमाने, चंदाताई ढोले, वसंतराव मनोरकर, अमोल मोगले, दिगंबरजी क्षीरसागर, चैतन्य गाडेकर यांच्यासह समाजातील अनेक दानशूरांनी योगदान दिले. समाजाच्या देणगीतून हा मानस्तंभ उभारण्यात येत आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनाबद्दल आचार्य सुयशगुप्ती महाराजांनी विश्वस्त मंडळ, महिला मंडळ, बहू मंडळ व छात्रावास समितीचे अभिनंदन केले.

# भास्कर कुलकर्णी यांची 'राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६'साठी निवड



**तभा वृत्तसेवा पैठण दि ०९ :** आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिर, पैठणचे मुख्याध्यापक भास्कर रामराव कुलकर्णी यांच्या शैक्षणिक, सामाजिक व सेवाभावी कार्याची दखल घेत स्विफ्ट अँड लिफ्ट फाउंडेशन पुणे यांच्या वतीने दिला जाणारा 'राष्ट्रीय आदर्श मुख्याध्यापक व शाळा पुरस्कार २०२६' जाहीर झाला आहे. विशेष म्हणजे वेदमंगल प्रतिष्ठान, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने आयोजित 'मराठवाडा रत्न आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार' यासाठीही त्यांची निवड झाली आहे. त्यामुळे त्यांच्या कार्याला एकाच वेळी दोन प्रतिष्ठित पुरस्कारांची सलामी मिळाली आहे.

मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी यांनी शाळेच्या शैक्षणिक गुणवत्तावाढीसाठी सातत्यपूर्ण प्रयत्न, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रम, गुणवत्तापूर्ण शिक्षणाची अंमलबजावणी तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना सोबत घेऊन शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी केलेले कार्य उल्लेखनीय ठरले आहे.

'विद्यार्थी केंद्रस्थानी आणि गुणवत्ता हेच ध्येय' या विचारातून त्यांनी शाळेच्या विकासाला नवी दिशा दिली. शैक्षणिक उपक्रमांसोबतच विद्यार्थ्यांमध्ये संस्कार, नेतृत्वगुण, क्रीडा, कला, विज्ञान, स्पर्धात्मक परीक्षांची तयारी आणि सामाजिक जाणीव निर्माण करण्यासाठी विविध उपक्रम राबविण्यात त्यांचा महत्त्वाचा वाटा आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली शाळेने शैक्षणिक गुणवत्तेसोबतच विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली आहे.

मुख्याध्यापक म्हणून केवळ प्रशासकीय जबाबदारी न निभावता शिक्षक, विद्यार्थी आणि पालक यांच्यात समन्वय साधत शाळेला प्रगतीच्या दिशेने घेऊन जाणारे नेतृत्व म्हणून भास्कर कुलकर्णी यांची ओळख निर्माण झाली आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण आणि सेवाभावी कार्याची पावती म्हणून दोन प्रतिष्ठित पुरस्कारांसाठी झालेली निवड ही आर्य चाणक्य प्राथमिक विद्या मंदिरसह संपूर्ण पैठणसाठी अभिमानाची बाब मानली जात आहे.

या निवडीबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ. सुरेंद्र आलुरकर, कार्यवाह डॉ. हेमंत वैद्य, प्रशासकीय अधिकारी चंद्रकांत मुळे, उपाध्यक्ष श्रीमती ज्योती ठाकूर, विद्यासभा अध्यक्ष डॉ. जयंत जोशी, संकुलाचे पालक उमेश जगताप, स्थानिक व्यवस्था समितीचे अध्यक्ष डॉ. पद्मकुमारजी कासलीवाल, कार्यवाह जुगलकिशोर लोहिया, प्राथमिक शाळा समितीचे अध्यक्ष शिवाजी मारवाडी, माध्यमिक शाळा समितीचे अध्यक्ष नंदकिशोर मालाणी, तसेच विजय चाटुपळे, डॉ. राम लोंढे, मनोज शुक्ल, किशोर भाकरे, विजय पापडीवाल, दत्तात्रय पोहेकर, रविंद्र साळजोशी, मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती जोशी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन केले.

भास्कर कुलकर्णी यांच्या या दुहेरी पुरस्कार निवडीबद्दल शैक्षणिक, सामाजिक तसेच विविध क्षेत्रांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून, त्यांच्या कार्याचा आणि नेतृत्वाचा हा गौरव शिक्षक क्षेत्रासाठी निश्चितच प्रेरणादायी ठरत आहे.

## गणपती उत्सव डीजे मुक्त साजरा करण्याचे आवाहन.

**पैठण प्रतिनिधी दि १० :-** पैठण तालुक्यातील तमाम गणेश भक्तांनी श्री उत्सव साजरा करण्यासाठी सामाजिक भान ठेऊन डीजे चा वापर टाळावा असे आवाहन पोलिसांच्या वतीने करण्यात आले आहे. तहसील कार्यालय सभागृहात आयोजित गणेश उत्सव शांतता कमिटीच्या बैठकीत हे आवाहन करण्यात आले. पैठण उपविभागात असलेल्या पैठण , पैठण एम.आय.डी.सी , बिडकीन, पाचोड पोलीस स्टेशन मधील सर्व पोलीस पाटील, गणेश मंडळाचे अध्यक्ष उपाध्यक्ष व इतर प्रतिष्ठित नागरिकांची , संबंधित सर्व विभाग प्रमुख, यांची गणेशोत्सव 2026 च्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने तहसील कार्यालय पैठण येथे माजी मंत्री अनिल पटेल, उपविभागीय पोलीस अधिकारी सुनील पाटील यांचे मार्गदर्शनाखाली समन्वय व शांतता समितीची बैठक घेण्यात आली. बैठकीसाठी प्रशिक्षणार्थी पो उप अधीक्षक सोनाली पैकवार ,पोलीस निरीक्षक महादेव गोमारे, स पो नि सचिन पंडीत, भरत मोरे इतर अधिकारी व अंमलदार हजर होते. गणपती उत्सव हा डीजे मुक्त वातावरणात नियमाचे पालन करून पारंपरिक पद्धतीने साजरा करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

## एच1 एन1, डेंग्यूचा वाढता धोका; नागरिकांनी सतर्क राहावे

तभा वृत्तसेवा

**नांदेड :** महाराष्ट्रात एच१ एन१ (स्वाईन फ्लू) आणि डेंग्यूच्या रुग्णसंख्येत वाढ होत असल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी आरोग्याबाबत अधिक सतर्क राहावे, असे आवाहन स्टार हेल्थ अँड अलाइड इन्शुरन्स कंपनी लिमिटेडचे चीफ क्लेम्स ऑफिसर डॉ. अभिजित घोष यांनी केले आहे.

आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, २१ ऑगस्ट २०२६ पर्यंत राज्यात एच१ एन१चे १ हजार १०९ रुग्ण आढळले आहेत. ही संख्या २०२५ मधील संपूर्ण वर्षातील ९४२ रुग्णांपेक्षा अधिक आहे. तसेच, १ जानेवारी ते १४ ऑगस्टदरम्यान डेंग्यूचे ५ हजार ५५८ रुग्ण नोंदविण्यात आले असून, मागील वर्षी याच कालावधीत ४ हजार ३४४ रुग्ण आढळले होते.

सतत किंवा वाढता ताप, तीव्र अंगदुखी, उलट्या, थकवा, श्वास घेण्यास त्रास किंवा शरीरातील पाणी कमी होण्याची लक्षणे दिसल्यास दुर्लक्ष करू नये. विशेषतः लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि अन्य आजार असलेल्या व्यक्तींनी तातडीने डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

नागरिकांनी स्वच्छता राखणे, सुरक्षित पाणी पिणे, डासांची पैदास रोखणे आणि डासांपासून संरक्षणासाठी आवश्यक उपाययोजना करणे गरजेचे आहे. स्वतःहून औषधे न घेता लक्षणे कायम राहिल्यास वैद्यकीय तपासणी करून घ्यावी, असे डॉ. घोष यांनी सांगितले.

## औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., छत्रपती संभाजीनगर

मुख्य कार्यालय : डॉ.राजेंद्र प्रसाद मार्ग, छ.संभाजीनगर, पिन क्र. ४३१००५. पोस्ट बॉक्स क्र. ५२३

Email ID :- admindept@aurangabaddccb.bank.in, banking@aurangabaddccb.bank.in, agri@aurangabaddccb.bank.in Contact No : 0240-2334491/92, 2334983 (रजि.AGD/BNK/29/01 July 1983)

**अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सुचना (२०२५-२०२६)**

क्र.मु.का.शासन–बोर्ड – (१) | दिनांक : ११/०९/२०२६

**बँकेच्या सर्व सन्माननीय सभासदांना कळविण्यांत येते की, आपल्या औरंगाबाद जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सन २०२५–२६ ची अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा दिनांक २६.०९.२०२६, रोज शनिवार, दुपारी १२.३० वाजता बँकेच्या मुख्यालय इमारतीच्या चौथ्या मजल्यावरील सभागृहात छत्रपती संभाजीनगर येथे बँकेचे अध्यक्ष मा.आ. श्री.विलास संदिपान भुमरे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत असुन, त्यात खालील विषयावर विचार विनिमय करण्यासाठी आपण उपस्थित रहावे, ही विनंती.**

:- विषय :-

१. मागील अधिमंडळाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचुन कायम करणे.
२. सन २०२५–२०२६ सालचा बँकेच्या कामकाजाचा अहवाल, ताळेबंद व नफा–तोटा पत्रक वाचून कायम करणे.
३. सन २०२५–२०२६ मध्ये अंदाजापेक्षा जास्त झालेल्या खर्चास मंजुरी देणे.
४. सन २०२६–२०२७ साठीचे उत्पन्न व खर्चाचे अंदाजपत्रक मंजुर करणे.
५. सन २०२४–२०२५ सालचे वैधानिक लेखापरिक्षणातील दोष दुरूस्ती अहवालाची नोंद घेणे.
६. सन २०२५–२०२६ सालचे सनदी लेखापरिक्षकांचे लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
७. सन २०२६–२०२७ या आर्थिक वर्षाचे बँकेच्या वैधानिक लेखापरिक्षणासाठी सनदी लेखापाल यांची नियुक्ती करणे बाबत.
८. कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्ती वयोमर्यादे बाबत.
९. मे.अध्यक्ष साहेब यांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर विचार विनिमय करणे.

ठिकाण : छत्रपती संभाजीनगर
दिनांक : ११.०९.२०२६

संचालक मंडळाच्या आदेशावरून
अजय तु. मोटे
प्र.कार्यकारी संचालक

✻ महत्वाच्या सुचना ✻

१. प्रत्येक संस्थेने पंच कमिटीच्या ठरावाच्या प्रमाणित सत्यप्रतिसह आपल्या एका बिगर थकबाकीदार सभासदास सभेत भाग घेण्यासाठी प्रतिनिधी म्हणून पाठवावे. प्रतिनिधीने सभेस येतांना ठराव सोबत आणावा. (ठराव टपालाने पाठवू नये.)
२. दिनांक ३१/०३/२०२६ पर्यंत ज्यांचे सदस्यत्व बँकेने स्विकृत केले आहे त्यांनाच सभेत भाग घेता येईल.
३. कामकाजाबाबत सभेत काही प्रश्न विचारावयाचे असल्यास दिनांक १९/०९/२०२६ पर्यंत मुख्यालयास पाठवावेत. या तारखेनंतर आलेले प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत.
४. गणसंख्येच्या अभावी सभा तहकुब करावी लागल्यास त्याच दिवशी अर्ध्या तासाच्या अवधीनंतर त्याच ठिकाणी विषय पत्रिकेवरील कामकाजास सुरूवात केली जाईल. त्यावेळी कोरमची आवश्यकता राहणार नाही.
५. बँकेचे उपविधी ५ (ब) (अ) नुसार सभासदाने क्रियाशील सभासदाच्या व्याख्येप्रमाणे सभेला उपस्थित रहावे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

## अग्रलेख

# 'म्यूल' खात्यांचे भयंकर वास्तव

डिजिटल क्रांतीमुळे देशाचा कानाकोपरा जोडला जात आहे आणि ते उन्नत भविष्याचे लक्षणही आहे, यात वाद नाही. पण, याच तंत्रज्ञानाच्या पडद्याआड सायबर गुन्हेगारीची विषवल्ली मूळ धरत असून, ती देशाच्या अर्थव्यवस्थेला आणि कायदा-सुव्यवस्थेला आतून पोखरत आहे. महाराष्ट्राच्या टोकावर असलेल्या चंद्रपूर जिल्ह्यात भद्रावती तालुक्यातील गवराळा या अगदीच लहानशा गावात तब्बल ५० हून अधिक 'म्यूल अकाऊंट्स' सापडणे, ही 'गोष्ट छोटी डोंगराएवढी' अशी आहे. या गावातील एका चहाटपरीवाल्याच्या चौकशीतून गावातले ५० हून अधिक तर तालुक्यातील २०० पेक्षा जास्त 'म्यूल अकाऊंट्स' सहजतेने सायबर पोलिसांपुढे आले. एकट्या चंद्रपूर जिल्ह्यात लाखोंचा गैरव्यवहार अशा 'म्यूल अकाऊंट्स'च्या माध्यमातून झाला. ही समस्या केवळ एका जिल्ह्यापुरती मर्यादित नाही; तर ही देशाच्या ग्रामीण भागाला पद्धतशीरपणे अजस्त्र विळख्याची लहानशी कहाणी आहे. गवराळा गावापर्यंत पोहोचलेले हे लोण दिल्ली आणि जयपूरच्या हायटेक सायबर टोळ्यांशी जोडले जात आहे. त्यामुळे या जाळ्याची व्याप्ती आणि भयानकता प्रकर्षाने लक्षात येते.

'म्यूल' म्हणजे सोप्या भाषेत भाड्याचा वाहक, ज्याला बिनडोकपणे ओझे वाहणाऱ्या गाढवाची उपमा देता येते. सायबर गुन्हेगार स्वतःची ओळख लपवण्यासाठी तिसऱ्याच एखाद्या निष्पाप गरजू व्यक्तीच्या बँक खात्याचा वापर आपल्या बेकायदेशीर पैशांच्या देवाण-घेवाणीसाठी करतो, त्यास डिजिटल भाषेत 'म्यूल अकाऊंट' म्हणतात. 'आपले बँक खाते भाड्याने द्या आणि दरमहा १००० ते ५००० रुपये मिळवा' किंवा मग सरकारी योजनेचे अनुदान मिळवून देतो, कर्ज मिळवून देतो, अशी आमिषे दिली जातात. त्यासाठी काही स्थानिक दलालही पडद्याआड काम करीत असतात. एकदा का गरजू माणूस जाळ्यात ओढला गेला की, गुन्हेगार त्याचे पासबुक, चेकबुक, एटीएम कार्ड, नेट बँकिंगचे पासवर्ड आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे त्या खात्याशी लिंक असलेले सिमकार्ड आणि मोबाईल फोनसुद्धा स्वतःच्या ताब्यात घेतो. गवराळ्यातल्या ज्या ग्रामस्थांशी हा गैरव्यवहार केला गेला, त्यांच्या हाती या सर्व गॅजेटसाठी एकरकमी हजार किंवा दोन हजार रुपयांची क्षुल्लक रक्कम ठेवली गेली. त्यांच्या खात्यात नंतर जमा झालेला सायबर गुन्ह्याचा पैसा पुढच्या अवघ्या तास-दोन तासांत देशभरातील शेकडो वेगवेगळ्या 'म्यूल' खात्यांतून फिरला आणि विभाजित झाला. असा हा काळा पैसा शेवटी 'क्रिप्टो करन्सी' किंवा रोख रकमेच्या रूपात बाहेर काढला जातो. हे रोखण्यासाठी सायबर पोलिसांकडे 'गोल्डन अवर'चा अगदीच माफक वेळ असतो. पण तोवर पिडित पोलिसांकडे पोहोचत नाही आणि तो लुटला जातो.

चंद्रपूर पोलिसांच्या सायबर सेलने गवराळा प्रकरणी काही खाती गोठवून चार गुन्हे दाखल केले असले, तरी हे एका हिमनगाचे वर आलेले खूपच लहानसे टोक आहे. केंद्रीय गृह मंत्रालयाच्या माहितीनुसार, २०२३-२४ या एकाच वर्षात देशात १० लाखांहून अधिक सायबर फसवणुकीच्या तक्रारी दाखल झाल्या. या सर्व गुन्ह्यांमागे दरमहा सरासरी ५० हजार ते ७० हजार म्यूल खात्यांचा वापर होत असल्याचे पुढे आले. देशात सायबर गुन्ह्यांच्या बाबतीत आणि 'म्यूल अकाऊंट्स'च्या वापरात महाराष्ट्र आघाडीच्या राज्यांपैकी एक आहे. महाराष्ट्रात गेल्या दोन वर्षांत १.५ लाखांपेक्षा जास्त संदिग्ध बँक खाती सायबर सेल आणि बँकांनी गोठवली आहेत. देशभरात सायबर गुन्हेगारांनी म्यूल खात्यांच्या माध्यमातून एकाच वर्षात ७ हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त रकमेची हेराफेरी केली गेली आहे. या संपूर्ण खेळात दुर्दैवी आणि संतापजनक बाब म्हणजे, मुख्य सूत्रधार दिल्ली किंवा जयपूरसारख्या दूरवरच्या शहरात बसून 'एन्क्रिप्टेड अ‍ॅप्स' वरून पुरावे नष्ट करतात. जसे, गवराळा प्रकरणात इंस्टाग्रामवरील चॅट मिटवून आरोपी पळाले आणि पोलिसांच्या तावडीत सापडला त्या गावाचा गरीब चहाटपरीवाला किंवा एखादा अडाणी शेतकरी! एखाद्याचे नाव सायबर गुन्ह्यात आले की त्याचे आधार, पॅन आणि सर्व बँक खाती कायमची 'ब्लॉक' होतात. भविष्यकाळात त्यांना कोणतेही कर्ज, सरकारी योजना किंवा नोकरी मिळणे अशक्यप्राय ठरते. अवघ्या काही हजार रुपयांच्या लालसेने संपूर्ण कुटुंब न्यायालयाच्या आणि पोलिस ठाण्यांच्या फेऱ्यांत उद्ध्वस्त होते. गेल्या दोन वर्षांत देशात गाजलेल्या 'चायनीज लोन ॲप' घोटाळ्यात, 'पार्ट टाईम जॉब' व 'टास्क फ्रॉड'मध्ये आणि सध्या थैमान घालत असलेल्या 'डिजिटल अरेस्ट'च्या गुन्ह्यांमध्ये पीडितांकडून उकळलेले कोट्यवधी रुपये अशा ग्रामीण म्यूल खात्यांमध्येच वळवले जातात.

अशा प्रकाराला आळा घालण्यासाठी काही कायदे जरूर आहेत. जसे, भारतीय न्याय संहिता, २०२३ मधील कलम ३१८ अन्वये बनावट ओळख दाखवून किंवा आमिष दाखवून बँक खाते उघडणे किंवा वापरणे. कलम ३३६/३३८ मध्ये दुसऱ्याच्या नावावर बनावट केवायसी तयार करणे. कलम ६१ अंतर्गत सायबर गुन्हेगारांना खाते पुरवून गुन्ह्यात सहभाग नोंदवणे. सोबतच माहिती तंत्रज्ञान कायदा २००० च्या कलम ६६ (उ) नुसार दुसऱ्याचे पासवर्ड, सिम किंवा एटीएम कार्ड बेकायदेशीरपणे वापरणे, कलम ६६ (ऊ) डिजिटल माध्यमांतून पैसे उकळणे किंवा फिरवणे. त्याचबरोबर मनी लॉंड्रिंग प्रतिबंधक कायदा २००२ नुसार बेकायदेशीरपणे मिळवलेला पैसा अधिकृत बँकिंग प्रणालीतून फिरवून तो वैध दाखवण्याचा प्रयत्न करणे आदी. पण सायबर भामटे या कायद्यांतील पळवाटाही शोधतात आणि गैरफायदा घेतात. गुन्हेगार टेलिग्राम, इंस्टाग्राम किंवा व्हॉट्सॲपवर 'डिसपिअरिंग मेसेज' किंवा 'एन्क्रिप्टेड चॅट' वापरतात. अनेक बँकांमध्ये किंवा डिजिटल पेमेंट बँकांद्वारे 'व्हर्च्युअल केवायसी' करताना पडताळणीची कडक नियमावली पाळली जात नाही. एकाच मोबाईल क्रमांकावर किंवा पत्त्यावर अनेक खाती सुरू असली, तरी सिस्टिमकडून वेळेत 'रेड फ्लॅग' दाखवला जात नाही. प्री-पेड सिमकार्ड्स सहजतेने बनावट कागदपत्रांवर उपलब्ध होतात. ही सिमकार्ड्स राजस्थान, बिहार किंवा दिल्लीत बसून चालवली जातात; मूळ सिमधारकाला त्याची कल्पनाच नसते. वेगवेगळ्या राज्यांच्या पोलिसांमधील समन्वयाचा अभाव आणि तपासासाठी लागणारा विलंब याचाही फायदा आरोपींना मिळतो. त्यामुळे मूळ सूत्रधार मोकाट राहतात आणि फक्त स्थानिक गरीब किंवा गरजू नागरिक पोलिसांच्या कारवाईत अडकतात.

या वाढत्या आणि बिकट संकटाला आळा घालण्यासाठी प्रशासकीय, तांत्रिक आणि सामाजिक पातळीवर महत्त्वाची पावले उचलणे गरजेचे आहे. रिझर्व्ह बँकेने सर्व बँकांना 'रिअल-टाईम फ्रॉड मॉनिटरिंग' बंधनकारक केले पाहिजे. एखाद्या ग्रामीण किंवा निष्क्रिय खात्यावर अचानक लाखो रुपयांचे जलद व्यवहार सुरू झाल्यास ते खाते एआयचा वापर करून आपोआप 'गोठवले' गेले पाहिजे. भारतीय सायबर गुन्हे समन्वय केंद्राने सर्व बँकांशी समन्वय साधून संशयित म्यूल खात्यांचा मध्यवर्ती डेटाबेस तयार करावा; जेणेकरून एका बँकेत काळ्या यादीत आलेला नागरिक दुसऱ्या बँकेत खाते उघडू शकणार नाही. केवायसी कडक करणे, कायद्यातही सुधारणा करणे आणि 'नॅशनल सायबर रॅपिड रिस्पॉन्स फोर्स' तयार करणे. तसेच, केवळ बँक खातेदारालाच नव्हे, तर खात्याचा ताबा घेणाऱ्या मुख्य दलालांना पकडण्यासाठी कडक कायदेशीर तरतुदी कराव्या लागणार आहेत. आपले बँक खाते, एटीएम किंवा सिमकार्ड दुसऱ्याला भाड्याने देणे हा अजामीनपात्र गुन्हा आहे, असे फलक लावले पाहिजेत. शाळा-महाविद्यालयांतून जनजागरण मोहीम राबविली गेली पाहिजे. जर वेळीच या 'म्युलेक्स'च्या जाळ्यावर कठोर प्रहार केला नाही, तर देशाची डिजिटल अर्थव्यवस्था आणि ग्रामीण भागातील सामाजिक स्वास्थ्य धोक्यात येईल. ■

---

## तंत्रवेध

### डॉ. दीपक शिकारपूर

# डिजिटल युगातील भक्ती आणि भविष्याचा वेध

'काशीस जावे, नित्य वदावे...' ही जुनी म्हण आजही अनेकांच्या स्मरणात आहे. ही म्हण ज्या काळात प्रचलित झाली, त्या वेळी लांबचा प्रवास म्हणजे मोठे धाडस समजले जाई. आज मात्र परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. माहिती तंत्रज्ञान, इंटरनेट, स्मार्टफोन, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डिजिटल सेवांनी भक्तीचा चेहरामोहरा बदलून टाकला आहे. श्रद्धा तीच आहे, देव तोच आहे, पण भक्ती व्यक्त करण्याची साधने आधुनिक झाली आहेत. तिरुपती, शिर्डी, सिद्धिविनायक, वैष्णोदेवी, सोमनाथ, महाकालेश्वर, काशी विश्वनाथ अशा अनेक देवस्थानांच्या अधिकृत संकेतस्थळांवरून किंवा मोबाईल ॲपद्वारे दर्शनाचे आरक्षण करता येते. ऑनलाईन देणगी, प्रसादाची नोंदणी, अभिषेक, आरती किंवा विविध धार्मिक सेवांसाठी वेळ निश्चित करता येते. त्यामुळे भक्तांचा वेळ वाचतो आणि व्यवस्थापन अधिक सुबक होते. याहूनही महत्त्वाची बाब म्हणजे आभासी दर्शन. ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग, गंभीर आजाराने त्रस्त व्यक्ती, परदेशात राहणारे भारतीय किंवा प्रवास करणे शक्य नसलेले भक्त घरबसल्या थेट दर्शन घेऊ शकतात. अनेक मंदिरांमध्ये दररोज सकाळ-संध्याकाळच्या आरत्या, उत्सव आणि धार्मिक कार्यक्रमांचे थेट प्रक्षेपण केले जाते. इंटरनेटमुळे भौगोलिक अंतर श्रद्धेच्या आड येत नाही.

आज धार्मिक पर्यटनाचे स्वरूपही पूर्णपणे बदलले आहे. भारतीय रेल्वेच्या आयआरसीटीसीसारख्या सेवांमुळे विशेष तीर्थयात्रा पॅकेजेस सहज उपलब्ध झाली आहेत. धर्मग्रंथांच्या बाबतीतही मोठा बदल घडला आहे. गीता, रामायण, महाभारत, ज्ञानेश्वरी, दासबोध, गुरुग्रंथसाहिब, बायबल किंवा कुराणसारखे ग्रंथ आज डिजिटल स्वरूपात उपलब्ध आहेत. ई-पुस्तके, पीडीएफ, ऑडिओबुक आणि पॉडकास्टच्या माध्यमातून कोणीही कुठेही त्यांचे वाचन किंवा श्रवण करू शकतो. विशेष म्हणजे दृष्टिहिनांसाठी ध्वनी स्वरूपातील ग्रंथ, मोठ्या अक्षरांमधील आवृत्त्या आणि ब्रेल स्वरूपातील साहित्य उपलब्ध होत आहे.अनेक ॲप्समध्ये मंत्रांचे उच्चार, अर्थ, भाषांतर आणि अभ्यासासाठी मार्गदर्शनही मिळते. नवीन पिढीला धर्म समजून घेणे अधिक सोपे झाले आहे. कृत्रिम बुद्धिमत्तेने या क्षेत्रातही प्रवेश केला आहे. सामाजिक माध्यमांनीही धार्मिक जीवनात मोठी क्रांती घडवली आहे. अनेक संत, आध्यात्मिक संस्था, मठ, आश्रम आणि प्रवचनकार यूट्यूब, फेसबुक, इंस्टाग्राम किंवा इतर माध्यमांवरून लाखो लोकांपर्यंत पोहोचत आहेत.

असे असले तरी या डिजिटल भक्तीबरोबर काही आव्हानेही निर्माण झाली आहेत. इंटरनेटवर धार्मिक नावाखाली चुकीची माहिती, अंधश्रद्धा, बनावट चमत्कार, अफवा किंवा आर्थिक फसवणूक करणाऱ्या संकेतस्थळांची संख्या वाढली आहे. काही जण बनावट देणगी संकेतस्थळे तयार करून लोकांची फसवणूक करतात. त्यामुळे कोणतीही देणगी देताना किंवा ऑनलाईन व्यवहार करताना अधिकृत संकेतस्थळे आणि प्रमाणित ॲप्सच वापरणे अत्यंत आवश्यक आहे. अर्थात प्रत्यक्ष मंदिरातील वातावरण, घंटानाद, सामूहिक आरती, प्रसाद, वारकरी दिंडी, भजन-कीर्तन किंवा यात्रेचा सामुदायिक अनुभव यांची जागा कोणतेही तंत्रज्ञान घेऊ शकत नाही. आभासी दर्शन ही सोय आहे; प्रत्यक्ष दर्शनाचा पर्याय नाही. श्रद्धेचा खरा अनुभव हा प्रत्यक्ष सहभागातूनच अधिक गहिरा होतो. भविष्यात या क्षेत्रात आणखी अनेक बदल दिसतील. व्हर्च्युअल रिॲलिटी आणि ऑगमेंटेड रिॲलिटीच्या साहाय्याने घरातूनच मंदिरातील प्रत्यक्ष उपस्थितीचा अनुभव मिळू शकेल. कृत्रिम बुद्धिमत्ता प्रत्येक व्यक्तीच्या आवडीनुसार धर्मग्रंथांचे अध्ययनक्रम तयार करेल. विविध भाषांमधील प्रवचने तत्काळ मातृभाषेत ऐकता येतील. इतिहास, पुराणे आणि धार्मिक स्थळांचा त्रिमितीय अनुभव विद्यार्थ्यांना सहज उपलब्ध होईल. अर्थात मंदिरांच्या नावाने बनावट संकेतस्थळे तयार करून देणगी गोळा करणे, खोट्या दर्शनाच्या लिंक पाठवून आर्थिक फसवणूक करणे आदी गुन्ह्यांचे प्रमाण वाढत आहे. त्यामुळे केवळ अधिकृत संकेतस्थळे, प्रमाणित मोबाईल ॲप्स आणि सुरक्षित डिजिटल पेमेंट प्रणालींचाच वापर करणे आवश्यक आहे.

या बदलत्या डिजिटल विश्वामुळे जेन-झी पिढीसाठी करीअरच्या नव्या संधीही निर्माण होत आहेत. धार्मिक संस्थांचे डिजिटल व्यवस्थापन, संकेतस्थळ आणि मोबाईल ॲप विकास, थेट प्रक्षेपण (लाईव्ह स्ट्रीमिंग), सामाजिक माध्यम व्यवस्थापन, डिजिटल संग्रहालये, वारसा संवर्धनासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता, भारतीय भाषांमधील भाषांतर, डिजिटल ग्रंथालये, सायबर सुरक्षा, डेटा विश्लेषण, आभासी वास्तव (व्हर्च्युअल रिॲलिटी) आणि संवर्धित वास्तव (ऑगमेंटेड रिॲलिटी) यांच्या माध्यमातून धार्मिक पर्यटन प्रभावी बनवणे अशा अनेक क्षेत्रांमध्ये कुशल युवकांची गरज वाढत आहे. भविष्यात डिजिटल हेरिटेज मॅनेजमेंट, स्पिरिच्युअल टेक्नॉलॉजी, संस्कृत आणि भारतीय भाषांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता तसेच धार्मिक संस्थांच्या सायबर संरक्षणासारख्या नव्या व्यवसायांनाही मोठी मागणी निर्माण होणार आहे. आजची तरुण पिढी ताण, स्पर्धा, एकाकीपणा, सामाजिक माध्यमांचे व्यसन आणि मानसिक अस्थिरता अशा अनेक आव्हानांना सामोरी जात आहे. अशा परिस्थितीत नियमित ध्यान, योग, प्रार्थना, नामस्मरण, संतसाहित्याचे वाचन, गीतेतील कर्मयोग, बुद्धांचा मध्यममार्ग किंवा विवेकानंदांचे प्रेरणादायी विचार यामुळे मनाला स्थैर्य मिळते. आज अनेक मानसिक आरोग्य तज्ज्ञही ध्यान आणि 'माइंडफुलनेस'चा सकारात्मक परिणाम मान्य करतात. कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित समुपदेशन साधने, ध्यानासाठी मोबाईल ॲप्स आणि ऑनलाइन आध्यात्मिक मार्गदर्शन या माध्यमांतून लाखो तरुणांना मानसिक आधार मिळत आहे. तंत्रज्ञान आणि अध्यात्म यांचा समतोल साधणारी ही जीवनशैली भविष्यात निरोगी मूल्याधिष्ठित समाजाची पायाभरणी करेल.

भारतीय संस्कृतीची खरी ताकद तिची बदल स्वीकारण्याची क्षमता आहे. मुद्रणयंत्र आले तेव्हा ग्रंथ अधिक लोकांपर्यंत पोहोचले; रेडिओ आणि दूरदर्शन आले तेव्हा प्रवचने घराघरात पोहोचली; इंटरनेट आणि स्मार्टफोन आले तेव्हा भक्ती जागतिक झाली; आणि आता कृत्रिम बुद्धिमत्तेमुळे ज्ञान अधिक वैयक्तिक, सुलभ आणि सर्वसमावेशक होत आहे. श्रद्धा, भक्ती आणि अध्यात्म यांचा गाभा कधीही बदलत नाही; बदलतात ती केवळ माध्यमे. तंत्रज्ञान हे देवाची जागा घेण्यासाठी नाही, तर भक्त आणि परमेश्वर यांच्यातील अंतर कमी करण्यासाठी आहे. योग्य विवेक, सुरक्षितता आणि संतुलित वापर यांच्या साहाय्याने डिजिटल युगातील भक्ती ही अधिक ज्ञानसमृद्ध, सर्वसमावेशक आणि जागतिक स्वरूपाची ठरू शकते. ■

(लेखक उद्योजक व संगणक साक्षरता प्रसारक आहेत.)

---

## वेध

### नंदकिशोर काथवटे

# गोड विषाची सवय

आज आपल्या घरात एक असा 'गोड शत्रू' प्रवेश करून बसला आहे, ज्याला आपण प्रेमाने ताटात वाढतो, चहाच्या कपात मिसळतो आणि मुलांच्या हातात चॉकलेटच्या रूपाने देतो. त्याचे नाव आहे- साखर! तंबाखूच्या पाकिटावर 'आरोग्यास घातक' असा इशारा वाचून आपण सावध होतो; पण साखरेचा चमचा हातात घेताना अशी कोणतीही भीती मनात निर्माण होत नाही. उलट 'गोड खा, गोड बोला' म्हणत आपण तिचे स्वागतच करतो. साखरेच्या अतिरेकाबाबत जगभरातील आरोग्य संस्था सातत्याने इशारा देत आहेत. आयसीएमआर-इंडियाच्या अभ्यासानुसार देशात सुमारे १०.१ कोटी लोक मधुमेहाने तर १३.६ कोटी लोक मधुमेहपूर्व अवस्थेत आहेत. लठ्ठपणाचे प्रमाणही कोट्यवधींच्या घरात पोहोचले आहे. हे आकडे केवळ आकडे नाहीत; या प्रत्येक आकड्यामागे एक कुटुंब, एक स्वप्न आणि एका निरोगी आयुष्याची चिंता आहे. साखर म्हणजे फक्त चहात टाकलेली साखर नव्हे. शीतपेये, मिठाई, बिस्किटे, केक, पेस्ट्री, चॉकलेट, आईस्क्रीम आणि अनेक तयार खाद्यपदार्थांमधूनही अतिरिक्त साखर शरीरात जाते. त्यामुळे 'मी फार गोड खात नाही' असे म्हणताना आपण नकळत किती साखर खातो, याचा विचार करणे गरजेचे आहे. साखरेचा अतिरेक झाला की त्याचा परिणाम लगेच दिसत नाही. शरीर हळूहळू इशारे देत राहते. वजन वाढते, पोटावर चरबी वाढते, दातांचे विकार होतात आणि शरीरातील चयापचय बिघडू शकतो. पुढे मधुमेह, फॅटी लिव्हर आणि हृदयविकारासारख्या आजारांचा धोका वाढू शकतो. साखर हा या आजारांचा एकमेव कारणीभूत घटक नाही; मात्र अतिरिक्त साखर, जास्त कॅलरी आणि चुकीची जीवनशैली यांचा एकत्रित परिणाम आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. डब्ल्यूएचओ मुक्त साखरेचे सेवन कमी करण्याचा सल्ला देते. दिवसाच्या एकूण ऊर्जेपैकी मुक्त साखर १० टक्क्यांपेक्षा कमी असावी आणि शक्य असल्यास ती ५ टक्क्यांपर्यंत आणावी, असे आरोग्य मार्गदर्शक तत्त्व सांगते. साधारणपणे हे प्रमाण दिवसाला २५ ग्रॅम, म्हणजे जवळपास सहा चमचे इतके मानले जाते. मात्र आपण एका दिवसात चहा, बिस्किटे, शीतपेये आणि गोड पदार्थातून यापेक्षा कितीतरी जास्त साखर घेत असतो.

साखरेची निर्मिती ही एक शास्त्रीय प्रक्रिया आहे. उसाचा रस काढून त्याचे शुद्धीकरण केले जाते. त्यानंतर बाष्पीभवन, स्फटिकीकरण आणि इतर प्रक्रियांमधून साखरेचे स्फटिक तयार होतात. ही प्रक्रिया साखरेला विष बनवत नाही. समस्या आहे ती तिच्या अति सेवनाची. त्यामुळे पांढरी साखर म्हणजेच विष, असा सरळ निष्कर्ष काढण्यापेक्षा आपण ती किती आणि किती वेळा खातो, याकडे लक्ष देणे अधिक महत्त्वाचे आहे. आज साखरेच्या किमती वाढल्याने सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर परिणाम होत आहे. साखर महागली म्हणून ओरडणे स्वाभाविक आहे; त्याचवेळी एक प्रश्न स्वतःला विचारण्याची गरज आहे- आज साखरेसाठी जास्त पैसे मोजावे लागत आहेत म्हणून आपण चिंतित आहोत, पण उद्या तिच्या अति सेवनामुळे होणाऱ्या आजारांसाठी किती किंमत मोजावी लागेल? औषधांचा खर्च कोण करणार? तपासण्यांचा खर्च कोण करणार? मधुमेहामुळे रोज औषधे घेण्याची वेळ आली तर त्याची जबाबदारी कोण घेणार? आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, आजारामुळे आयुष्यातील हरवलेली निरोगी वर्षे कोण परत आणणार? म्हणूनच साखरेशी पूर्णपणे शत्रुत्व करण्याची गरज नाही; पण तिच्यावर नियंत्रण ठेवण्याची वेळ नक्कीच आली आहे. चहातील साखर हळूहळू कमी करणे, साखरयुक्त पेयांऐवजी पाणी पिणे, पाकीटबंद पदार्थांवरील माहिती वाचणे, मिठाईचे प्रमाण कमी करणे आणि मुलांना प्रत्येक आनंदाच्या प्रसंगी चॉकलेट देण्याची सवय कमी करणे या छोट्या गोष्टी आहेत. पण मोठा बदल याच छोट्या सवयींमधून घडतो. आपल्या ताटातील, कपातील आणि बाटलीतील साखरेकडे गांभीर्याने पाहण्याची वेळ आली आहे. कारण गोड पदार्थ खाल्ल्याने मिळणारा आनंद काही क्षणांचा असतो; पण त्याचा अतिरेक शरीरावर उमटवणारे परिणाम वर्षानुवर्षे सोबत राहू शकतात. आपल्या मुलांना चॉकलेट देताना आपण प्रेम देतो; पण त्यांना चांगल्या आहाराची सवय लावणे हे त्याहून मोठे प्रेम आहे. कुटुंबातील प्रत्येक व्यक्तीने साखरेचे प्रमाण थोडे कमी करण्याचा निर्णय घेतला, तर त्याचा फायदा संपूर्ण कुटुंबाच्या आरोग्याला होऊ शकतो. आयुष्य गोड असावे, यात दुमत नाही. पण त्या गोडव्याची किंमत आपल्या आरोग्याने मोजावी लागू नये. आज एक चमचा साखर कमी करणे कदाचित छोटा निर्णय वाटेल; पण उद्याच्या निरोगी आयुष्यासाठी तोच निर्णय मोठी गुंतवणूक ठरू शकतो. गोडवा जपायचा असेल तर तो साखरेत नव्हे, आपल्या निरोगी आयुष्यात जपूया. ■

९९२२९९९५८८

---

## दिल्ली वार्तापत्र

### श्यामकांत जहागीरदार

# मायावती यांचा धरसोडीचा खेळ

बसपाच्या सर्वेसर्वा मायावती यांनी उत्तरप्रदेश आणि देशातील अन्य राज्यातील विधानसभा निवडणुका स्वबळावर लढवण्याची घोषणा केली आहे. या घोषणेची शाई वाळत नाही, तोच बसपातील अंतर्गत कलह समोर आला आहे. उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीला काही महिने उरले असताना बसपातील हा घटनाक्रम त्या पक्षाला अडचणीत आणणारा म्हटला पाहिजे. एकेकाळी देशातील प्रमुख राष्ट्रीय पक्ष असलेल्या बसपा गेल्या काही वर्षांपासून मुख्य राजकीय प्रवाहापासून बाहेर फेकला गेला आहे. त्याचा आता पहिलेसारखा राजकीय प्रभाव उरला नाही. लोकसभा आणि राज्यसभा सोडा उत्तरप्रदेश विधानसभेतही बसपाचे आमदार उरले नाही.

बसपाचे राष्ट्रीय समन्वयक आकाश आनंद यांची मायावती यांनी पदावरून हकालपट्टी केली. आकाश आनंद यांच्याकडे मायावती यांचा राजकीय उत्तराधिकारी म्हणून पाहिले जात होते. विशेष म्हणजे आकाश आनंद हे मायावती यांचे भाचे आणि बंधू आनंदकुमार यांचे ज्येष्ठ पुत्र आहेत. याआधी ७ मे २०२४ ला लोकसभा निवडणुकीच्या काळात मायावती यांनी आकाश आनंद यांना राष्ट्रीय समन्वयक पदावरून हटवले होते. त्यावेळीही त्यांच्यात राजकीय परिपक्वता नसल्याचा आरोप मायावती यांनी केला होता. मात्र, आकाश आनंद यांनी माफी मागितल्यानंतर काही महिन्यातच त्यांना पक्षात परत घेत मायावती यांनी त्यांना पक्षात महत्त्वाची जबाबदारी दिली. ३ मार्च २०२५ ला आकाश आनंद यांची दुसऱ्यांदा सर्व पदांवरून हकालपट्टी करण्यात आली. दुसऱ्याच दिवशी त्यांना पक्षातूनही बाहेर करण्यात आले. येत्या काही दिवसात त्यांची पक्षातूनही हकालपट्टी होण्याचे संकेत आहेत. पक्षातून हटवल्यानंतर आकाश आनंद यांनी समाजमाध्यमावर सुरुवातीला आपला उल्लेख बसपा कार्यकर्ता असा केला होता, काही तासातच त्यात बदल करत त्यांनी बसपा समर्थक असा आपला उल्लेख केला. याचाच अर्थ आपण आता बसपाचे कार्यकर्ता राहिलो नाही, हे आकाश आनंद यांनी दाखवून दिले. यावेळी त्यांची पक्षातील घरवापसी थोडी कठीण दिसते. कारण त्यांचे लहान भाऊ ईशान आनंद यांना मायावती यांनी पक्षात घेत आपला राजकीय उत्तराधिकारी म्हणून समोर केले आहे. घराणेशाहीच्या आरोपातून स्वतःची सुटका करण्यासाठी मायावती आपल्या एका भाच्याला पक्षातील पदावरून हटवतात, त्याचवेळी दुसऱ्या भाच्याला आपला राजकीय उत्तराधिकारी म्हणून समोर करतात, हे अनाकलनीय आहे.

ईशान आनंद यांना बसपाच्या सेक्टर एकचा प्रमुख बनवत त्यांच्याकडे उत्तराखंड आणि उत्तरप्रदेश सोडून देशातील अन्य १५ राज्यांची जबाबदारी सोपवली आहे. बसपात मायावती यांच्या खालोखाल एवढी जबाबदारी कोणत्याही नेत्याकडे नाही. ईशान आनंद यांना आपले वडील आनंदकुमार यांना रिपोर्ट करायचे निर्देशही मायावती यांनी दिले आहेत. आनंदकुमार हे मायावती यांचे कनिष्ठ बंधू आहेत. आकाश आनंद राजकीयदृष्ट्या परिपक्व नाहीत, असे जर मायावती यांना वाटते तर त्या त्यांच्याकडे प्रत्येक वेळी महत्त्वाची जबाबदारी का सोपवतात? आपला राजकीय उत्तराधिकारी म्हणून त्यांना समोर का करतात, हा प्रश्न आहे. याचे उत्तर कधीतरी मायावती यांना बसपाच्या भवितव्यासाठी द्यावेच लागेल. आपल्या धरसोड भूमिकेमुळे मायावती बसपाचे नुकसान करीत आहेत; पण ते त्यांना समजत नाही, असे म्हणावेसे वाटते. आकाश आनंद यांच्यावर सासरे अशोक सिद्धार्थ यांचा प्रभाव असल्याचे मानले जाते. बसपाचे माजी खासदार असलेले अशोक सिद्धार्थ हे पक्षात नवे प्रस्थ बनले होते. आकाश आनंद यांनी मायावती यांची कठपुतली न होता स्वतंत्रपणे निर्णय घ्यावे, असा अशोक सिद्धार्थ यांचा प्रयत्न होता. याच कारणावरून फेब्रुवारी २०२५ मध्ये अशोक सिद्धार्थ यांची बसपातून हकालपट्टी करण्यात आली होती. अशोक सिद्धार्थ आणि आकाश आनंद आपल्याविरुद्ध पक्षात षडयंत्र रचत असल्याचा मायावती यांचा संशय आहे. यामुळेच मायावती आकाश आनंद यांचे पंख अधूनमधून कापत असतात, अशी शंका घ्यायला जागा आहे. याचाच भाग म्हणून आकाश आनंद आणि अशोक सिद्धार्थ यांना सोशल मीडियावर अनफॉलो करण्याचे आदेशही मायावती यांनी बसपा कार्यकर्त्यांना दिले होते, असे म्हणतात.

मायावती यांनी चार वेळा उत्तरप्रदेशचे मुख्यमंत्रिपद भूषवले आहे. २००७ ते २०१२ हा त्यांचा मुख्यमंत्रिपदाचा चौथा आणि शेवटचा कार्यकाळ म्हटला पाहिजे. २०१२ नंतर उत्तरप्रदेशच्या राजकारणातून बसपाचा प्रभाव हळूहळू कमी होत गेला. २०१४, २०१९ आणि २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत बसपाचा प्रभाव पूर्णपणे ओसरला. त्याचप्रमाणे २०१२, २०१७ आणि २०२२ च्या उत्तरप्रदेश विधानसभा निवडणुकीतही सुरू झालेली बसपाची घसरण मायावती यांना थांबवता आली नाही. त्यातच मायावती यांच्या बसपावर भाजपाची बी टीम असा आरोप काँग्रेस आणि समाजवादी पक्षाने सुरू केला. हा आरोप मायावती यांना प्रभावीपणे खोडून काढता आला नाही. एकेकाळी उत्तरप्रदेशच्या राजकारणात मायावती हे मोठे प्रस्थ होते. आपले राजकीय अस्तित्व टिकवण्यासाठी मायावती यांनी २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत समाजवादी पक्षाशी आघाडी केली, पण त्याचा कोणताही फायदा बसपाला झाला नाही. विशेष म्हणजे उत्तरप्रदेशच्या राजकारणात सपा आणि बसपा म्हणजे साप आणि मुंगसाची जोडी म्हणायला पाहिजे. पण आपल्या राजकीय अस्तित्वासाठी मायावती यांना सपाशीही हातमिळवणी करावी लागली.

अन्य राजकीय पक्षांशी आघाडी करूनही त्याचा बसपाला कोणताही फायदा न मिळाल्यामुळे यावेळी स्वबळावर निवडणूक लढवण्याच्या मनस्थितीत मायावती आल्या असल्याचे समजते. २०२२ ची विधानसभा निवडणूक मायावती यांनी स्वळावर लढवली होती. राज्यातील सर्व म्हणजे ४०३ जागा लढवणाऱ्या बसपाला त्यावेळी फक्त जागा जिंकता आली होती. २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत तर बसपाला उत्तरप्रदेशात एकही जागा जिंकता आली नव्हती. उत्तरप्रदेश आणि देशाच्या राजकारणातून बसपा आता कालबाह्य होत चालली आहे. याला कारण मायावती यांची धरसोड भूमिकाही कारणीभूत आहे. मायावती आता राजकारणात पाहिजे तेवढ्या सक्रिय नाहीत. पक्षावरील त्यांची पकडही पहिलेसारखी दिसत नाही. आपल्या राजकीय सोयीनुसार त्या भूमिका घेऊ लागल्या आहेत. आकाश आनंद बसपाला वाढवण्याच्या प्रयत्नात होते तर त्यांच्यामुळे आपल्या राजकीय स्थानाला धक्का तर बसणार नाही, अशी भीती मायावती यांच्या मनात निर्माण झाल्यासारखी दिसते. आकाश आनंद यांना पक्षाच्या कामात पूर्ण स्वातंत्र्य न देणाऱ्या मायावती ईशान आनंद यांना काम करण्याची मोकळीक आणि स्वातंत्र्य देतील, याबाबत शंका आहे. मुळात पक्षाच्या वाढीसाठी काय केले पाहिजे, हे मायावती यांना कळेनासे झाले आहे. कधी आकाश आनंद यांना पदावरून आणि पक्षातून काढायचे तर काही दिवसांनी पुन्हा परत घ्यायचे, नंतर पुन्हा काढायचे, असा त्यांचा पोरखेळ सुरू आहे. यामुळे बसपाचे कायमस्वरूपी राजकीय नुकसान होत आहे. ■

९८८१७१७८१७

---

### फुफाजी पुन्हा नाराज होणार?

मराठी नातेसंबंधांमध्ये आत्याच्या नवऱ्याला उत्तर भारतीय हिंदी भाषेच्या प्रभावामुळे 'फुफाजी' असं म्हटलं जातं. अस्सल मराठीत त्यांना आतोबा किंवा मामा म्हणून संबोधतात. भारतीय लग्नांमध्ये 'नाराज फुफाजी' हे एक प्रसिद्ध पात्र मानलं जातं. फुफाजींना प्रत्येक गोष्टीत काही ना काही चुका काढून नाराज होण्याची सवय असते. पंतप्रधान नरेंद्र मोदींनी श्रीराम कॉमर्स कॉलेजच्या शताब्दी सोहळ्यात बोलताना विरोधकांसाठी 'नाराज फुफाजी' हा शब्दप्रयोग पहिल्यांदा वापरला. कॉलेजच्या विद्यार्थ्यांशी संवाद साधताना देशातील काही लोकांना त्यांनी 'नाराज फुफाजी' असं संबोधन बहाल केलं. सरकार कोणताही नवीन प्रकल्प किंवा पायाभूत सुविधा सुरू करत असेल तर विरोधी पक्ष 'याची काय गरज आहे?' असा प्रश्न विचारून आक्षेप घेतात. यूपीआय, स्टॅच्यू ऑफ युनिटी, बुलेट ट्रेन आणि नवीन संसद भवन या बाबतीत असं घडलं आहे. मुंबई ते वडोदरा दरम्यान सुरू झालेल्या डबल-स्टॅक कंटेनर मालगाडीबाबतही फुफाजी पुन्हा आरडाओरडा करतील अशी भविष्यवाणी मोदींनी केली. देशाच्या प्रगतीवर आणि विकासकामांवर टीका करणाऱ्या विरोधकांची खिल्ली उडवण्यासाठी मोदींनी हा नवा राजकीय शब्दप्रयोग केलेला आहे.

**डॉ. मदन काकडे**/९३७३११२४८७

■■■

## वाचक पत्रे

### बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा बैलपोळा

भारत हा कृषिप्रधान देश आहे. शेतीच्या कामात शेतकऱ्याला बैलांची मोठी मदत होते. या कष्टकरी बैलांप्रति कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी महाराष्ट्रात बैलपोळा हा सण मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. बैलपोळा हा शेतकऱ्यांसाठी अत्यंत आनंदाचा आणि भावनिक सण आहे. या दिवशी बैलांना शेतीची सर्व कामे करून घेण्यापासून विश्रांती दिली जाते. सकाळी बैलांना नदी किंवा विहिरीवर नेऊन स्वच्छ अंघोळ घातली जाते. त्यानंतर त्यांच्या शिंगांना रंग लावून, अंगावर सुंदर नक्षी काढून त्यांना सजवले जाते.

बैलपोळ्याच्या दिवशी बैलांना फुलांच्या माळा, रंगीत



वस्त्रे आणि सजावटीच्या वस्तूंनी सजवले जाते. त्यानंतर त्यांची पूजा केली जाते. त्यांना गोडधोड खाऊ घातले जाते. बैल हा केवळ शेतीतील एक प्राणी नसून शेतकऱ्याचा जिवलग सहकारी आहे. ऊन, वारा आणि पाऊस यांची पर्वा न करता तो शेतात कष्ट करतो. त्याच्या श्रमांमुळे शेतकऱ्याच्या शेतात पीक उभे राहते आणि अनेकांचे पोट भरते. त्यामुळे बैलपोळा हा केवळ एक सण नसून बैलांच्या श्रमांबद्दल प्रेम, आदर आणि कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. बैलांच्या योगदानाची जाणीव करून देणारा हा सण शेतकरी आणि बैल यांच्यातील जिव्हाळ्याचे नाते अधोरेखित करतो. बैलपोळा आपल्याला मुक्या प्राण्यांवर प्रेम करावे आणि त्यांच्या कष्टांची जाणीव ठेवावी, हा संदेश देतो. आधुनिक युगात शेतीची साधने बदलली असली तरी बैलांप्रति असलेला आदर आणि कृतज्ञतेची भावना कायम राहणे महत्त्वाचे आहे.

**श्रीकांत संभाजी मगर**/९६८९११७१६९

■■■

### सण आनंदाचे की विकृतीचे?

महाराष्ट्राला सण-उत्सवांची आणि समृद्ध संस्कृतीची मोठी परंपरा लाभलेली आहे. गणेशोत्सव, पोळा, नवरात्रोत्सव आणि दिवाळी यांसारखे सण आपल्या आयुष्यात उत्साह, आनंद व सामाजिक सलोखा निर्माण करण्यासाठी असतात. परंतु, अलिकडच्या काळात सण साजरे करण्याच्या पद्धतीत मोठा बदल होऊन त्यात कर्णकर्कश डीजे, डॉल्बी आणि प्रखर लेझर लाईट्ससारख्या घातक गोष्टींचा शिरकाव झाला. या पृष्ठभूमीवर नागपूरसह संपूर्ण महाराष्ट्रात आगामी सण-उत्सवांच्या काळात उच्च क्षमतेचे डॉल्बी, डीजे आणि प्रखर लेझर लाईट्सवर कडक प्रतिबंध घालण्यात येत आहेत, हा प्रशासनाचा निर्णय अत्यंत दूरदर्शी व नागरिकांच्या हिताचा आहे. गेल्या काही वर्षांत उत्सवांच्या मिरवणुका म्हणजे जणू आवाजाची आणि विकृतीची स्पर्धाच बनली होती. 'बेस'च्या कर्णकर्कश दणदणाटामुळे घरातील ज्येष्ठ नागरिक, रुग्ण आणि अभ्यास करणाऱ्या लहान मुलांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होत आहेत. याहूनही दुर्दैवी बाब म्हणजे, डीजेच्या तालावर वाजणारी अश्लील गाणी, त्यावर केले जाणारे विचित्र व असभ्य हावभाव आणि मद्यपान करून धिंगाणा घालणे, महिलांची छेड काढणे यांसारखे प्रकार मोठ्या प्रमाणावर वाढले आहेत. या बंदीचा दुसरा तितकाच गंभीर पैलू म्हणजे 'लेझर लाईट्स'चा विळखा. मिरवणुकीत सोडले जाणारे हे प्रखर लेझर बीम डोळ्यांच्या दृष्टीसाठी अत्यंत घातक ठरत आहेत. महाराष्ट्राची संस्कृती ही ढोल-ताशांचे पथक, पारंपरिक वाद्यांचा गजर, लेझीम आणि संदल यांवर आधारलेली आहे. डीजे आणि डॉल्बीशिवाय देखील आपले सण तितक्याच पारंपरिक जल्लोषात आणि शिस्तीत साजरे होऊ शकतात. यावर्षीचे सर्व सण विकृती आणि घातक साधनांपासून मुक्त ठेवून, संपूर्ण महाराष्ट्रात एका खऱ्या अर्थाने आरोग्यदायी व संस्कारक्षम वातावरणात पार पाडूया! ■

**वर्षा आवदे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र वाटपात झिरो पेंन्डसी

## १३ हजार ७१३ पैकी १३ हजार ७०७ अर्ज मंजूर, शिबीरांचे आयोजन



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

हिंगोली जिल्ह्यात कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा जात प्रमाणपत्रांची कार्यवाही गतिमान करण्यासाठी हिंगोली जिल्ह्यातील ४० महसूल मंडळात दि १७ सप्टेंबर पर्यंत विशेष शिबीरे आयोजित करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे जिल्ह्यात प्रशासनाच्या गतिमान धोरणामुळे १३ हजार ७१३ पैकी १३ हजार ७०७ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. त्यामुळे प्रस्ताव मंजूरीचे झिरो पेंडन्सी ठेवून हिंगोली जिल्हा अव्वल ठरला आहे. सध्या एकही प्रस्ताव प्रलंबीत नसल्याचे प्रशासनाच्यावतीने सांगण्यात आले.

जिल्ह्यात आढळून आलेल्या कुणबी, मराठा-कुणबी व कुणबी-मराठा अशा ४ हजार ५९९ नोंदी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आल्या आहेत. यापूर्वी ८ जानेवारी २०२४ रोजी ग्रामपंचायत स्तरावर विशेष शिबीरे घेवून या नोंदी प्रसिध्द करण्यात आल्या होत्या. १० सप्टेंबर २०२५ रोजीही नोंदी प्रसिध्द करण्यात आल्या असून दि ८ सप्टेंबर २०२६ पासून ग्रामपंचायत कार्यालयांच्या सूचना फलकांवर नोंदी प्रसिध्द करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यामुळे नागरिकांना आपल्या गावातील उपलब्ध नोंदी तपासता येणार असून प्रमाणपत्रासाठी आवश्यक पुराव्यांची माहीती मिळण्यास मदत होणार आहे.

जात प्रमाणपत्रासाठी आतापर्यंत प्राप्त १३ हजार ७१३ अर्जांपैकी १३ हजार ७०७ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. कागदपत्रांतील त्रुटींमुळे ६ अर्ज नामंजूर करण्यात आले आहेत. ९ सप्टेंबर २०२६ अखेर प्रमाणपत्रसाठी एकही अर्ज प्रलंबीत नाही, अशी माहीती जिल्हा प्रशासनाने दिली आहे.

हैदराबाद गॅझेटवर आधारीत प्राप्त अर्जांवरही शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यात आली आहे. २ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार प्राप्त ८० अर्जांपैकी ७६ अर्ज मंजूर करण्यात आले आहेत. हिंगोली जिल्ह्यात प्रमाणपत्र वाटपावर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्यासह उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, कळमनुरीच्या उपविभागीय अधिकारी प्रतिक्षा भूते, वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी विशेष लक्ष केंद्रीत केले आहे. त्यामुळे हिंगोली जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र वाटप झिरो पेंडन्सीत आहे. त्यानंतर प्रशासनाने ४० मंडळांमधून दि १७ सप्टेंबरपर्यंत विशेष शिबीरांचे आयोजन केले आहे.

या शिबीरांमध्ये जून्या महसूल नोंदी व अन्य पुरावे शोधणे, प्राप्त अर्ज व कागदपत्रांची तातडीने पडताळणी करणे आणि पात्र लाभार्थ्यांना जात प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्यावर भर दिला जाणार आहे. नागरिकांच्या अडचणींचे ताडीने निराकरण करण्यासाठी वसमतचे उपविभागीय अधिकारी विकास माने यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तहसीलदार, उपविभागीय अधिकारी आणि जात प्रमाणपत्र पडताळणी समितीशी समन्वय साधून प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी कार्यवाही करणार आहेत.

# वसमतमध्ये २२ वर्षीय तरूणाचा दगडाने ठेचून खून



**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १० सप्टेंबर**

शहरातील सोमवारपेठ परिसरात 'तू पोलिसांना टिप का देतोस? या कारणावरून २२ वर्षीय गणेश डिगांबर गुंडाळे याच्यावर दगड व विटांनी गंभीर हल्ला करून त्याचा खून केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी तिघांविरुद्ध वसमत शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ मधील कलम १०३(१), ३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मात्र, या प्रकरणातील सर्वात गंभीर प्रश्न आता पुढे येत आहे मयत तरुणाने पोलिसांना नेमकी कोणती 'टिप' दिली होती?

मिळालेला माहितीनुसार 'तू पोलिसांना टिप का देतोस?' या कारणाचा स्पष्ट उल्लेख आहे. त्यामुळे ही टिप नेमकी कोणत्या प्रकरणासंदर्भात होती, याचा तपास होणे अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे.

गुटखा, मटका, वाळू, जुगार, दारू, 'टिप' नेमकी कशाची? मयत गणेश गुंडाळे याने पोलिसांना कोणत्या प्रकारची माहिती दिली होती, याबाबत अधिकृत तपशील अद्याप समोर आलेला नाही. मात्र, या घटनेनंतर गुटखा, मटका, वाळू, जुगार, दारू किंवा इतर कोणत्याही कथित अवैध व्यवसायासंदर्भात मयताने पोलिसांना माहिती दिली होती का? असा सवाल नागरिकांमध्ये उपस्थित होत आहे.

आरोपींचा अशा कोणत्याही कथित अवैध व्यवसायाशी संबंध होता का? मयताने यापैकी कोणत्याही प्रकाराबाबत पोलिसांना माहिती दिली होती का? आणि त्या माहितीमुळेच त्याच्यावर हल्ला करण्यात आला का? या प्रश्नांची उत्तरे आता पोलिसांच्या तपासातूनच समोर येणे अपेक्षित आहे. दरम्यान, केवळ चर्चेच्या आधारावर कोणत्याही आरोपीचा अवैध व्यवसायाशी संबंध असल्याचे निष्कर्ष काढता येणार नाहीत. मात्र,पोलीसांना टिप का देतो? हा गुन्ह्याच्या कारणामध्ये नोंदवलेला मुद्दा असल्याने त्या टिपचा विषय शोधणे तपासातील महत्त्वाचा दुवा ठरू शकतो.

१० सप्टेंबर रोजी मध्यरात्री सुमारे १२.१५ वाजता सोमवारपेठ परिसरात हा प्रकार घडल्याची नोंद आहे. त्यानंतर सकाळी ७.४९ वाजता गुन्हा दाखल करण्यात आला. मिळालेल्या माहितीनुसार आरोपी अद्याप अटक झालेले नाहीत आणि गुन्ह्याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी मयताच्या मोबाईलमधील माहिती, कॉल रेकॉर्ड, त्याचे अलीकडील संपर्क, पोलिसांना दिलेल्या तक्रारी अथवा माहिती, तसेच घटनेपूर्वी आरोपींसोबत झालेला संपर्क याची सखोल चौकशी केल्यास 'टिप'चा खरा विषय समोर येऊ शकतो, अशी अपेक्षा आहे.

'टिप'मागचे सत्य उघड होणार का?

या खुनामागील नेमके कारण काय होते, 'टिप' कोणत्या प्रकरणाची होती आणि त्या माहितीमुळे कोणाला धोका किंवा नुकसान होणार होते, याचा तपास होणे गरजेचे आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ खुनाचा गुन्हा म्हणून न पाहता 'टिप'च्या मुळापर्यंत पोहोचण्याची गरज व्यक्त होत आहे.

पोलीस निरीक्षक वाघ, सहाय्यक पोलीस निरीक्षक परगेवार आणि पोलीस उपनिरीक्षक बोंडले यांनी घटनास्थळी भेट दिली असून तपास सुरू आहे. आता या तपासातून 'ती टिप नेमकी कशाची होती?' याचे उत्तर कधी आणि कसे समोर येते, याकडे वसमतकरांचे लक्ष लागले आहे.

# बैल पोळा, महालक्ष्मी सणानिमित्त बाजारपेठेत खरेदीसाठी गर्दी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

बैल पोळा, गणेशोत्सव तसेच महालक्ष्मी सणानिमित्त हिंगोलीच्या बाजारपेठेत विविध प्रकारचे साहित्य विक्रीस उपलब्ध झाले असून नागरिक मोठ्या संख्येने खरेदीसाठी गर्दी करीत आहेत.

बैल पोळा सणाला ग्रामीण भागातील नागरिकांकडून पोळ्याच्या तयारीसाठी विविध साहित्याची खरेदी केली जात असून, बाजारपेठेत मोठी गर्दी झाली होती. पोळ्यानिमित्त बैलांची सजावट करण्यासाठी बाजारात विविध प्रकारच्या रंगीबेरंगी झुली, शिंगांसाठी विविध रंग, वेसण, दोऱ्या, घुंगरांच्या माळी, करदौडे, खायचे पान तसेच इतर सजावटीचे साहित्य विक्रीस उपलब्ध झाले आहे. आकर्षक रंग व विविध डिझाइनमुळे या साहित्याला ग्राहकांकडून चांगली पसंती मिळत होती.

दरम्यान, पोळ्यासोबतच गणेशोत्सव आणि महालक्ष्मी सजावटीसाठी विविध प्रकारचे सुंदर मुखवटे बाजारात दाखल झाले आहेत. आकर्षक नक्षीकाम व रंगसंगती असलेल्या या मखवट्यांची किंमत साधारणपणे १ हजार ते ३ हजार रुपयांपर्यंत आहे. याशिवाय घरातील व सणाच्या सजावटीसाठी रंगीबेरंगी लोखंडी मखरही विक्रीस उपलब्ध झाले असून, त्यांची किंमत २ हजार ते ३ हजार रुपयांपर्यंत आहे.

बैलांच्या सजावटीसाठी आवश्यक साहित्याबरोबरच सणासुदीच्या इतर वस्तूंच्या खरेदीमुळे बाजारपेठेत उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. आगामी दिवसांत खरेदीला आणखी वेग येण्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे.

ग्रामीण भागासह शहरी भागातही धरोघरी पोळा सण साजरा करण्यात आला. येथील पोळा मारोती मंदिरात दर्शनासाठी शेतकऱ्यांनी बैलांना सजवून आणले होते.



**हिंगोली- वसमत तालुक्यातील कोनाथा येथे बैल पोळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी शेतकऱ्यांनी बैलांना सजवून गावातून भव्य मिरवणुक काढून मारोती मंदिरात दर्शनासाठी नेले. त्यानंतर बैलाची पूजा करण्यात आली. यावेळी गावकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. छाया- मारोती बेंडे**

## संक्षिप्त वृत्त

### राष्ट्रमाता जिजाऊमध्ये दहीहंडी उत्साहात साजरी




हिंगोली- शहरातील राष्ट्रमाता जिजाऊ विद्यानिकेतन मध्ये दहीहंडीच्या कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आल्या. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी दहीहंडी तयार करण्यापासून ते ती फोडे पर्यन्तच्या सहभाग घेतला तसेच यावेळी विद्यार्थ्यांनी राधा कृष्ण यांची वेशभूषा परिधान केली. श्रीकृष्णाची आरती करून दहीहंडी फोडण्यात आली. यशस्वीतेसाठी शाळा मुख्याध्यापक बल्लाळ, पर्यवेक्षक श्रीकांत कान्हेड, शिक्षिका पाईकराव, कान्हेड, पडघन, वाबळे, टेकाळे, ठोके, सोळंके, काळे आदी शिक्षिका आणि शेख इम्रान आणि नरवाडे ताईंनी सहकार्य केले.

### आदर्शमध्ये रासेयोकडून श्रमदान



हिंगोली- येथील आदर्श शिक्षण संस्था हिंगोलीच्या कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने श्रमदान कार्यक्रम आयोजन करण्यात आले होते. महाविद्यालयातील युवकांमध्ये श्रम प्रतिष्ठा, स्वावलंबन, देशभक्ती, सामाजिक बांधिलकी, विज्ञानवाद, निसर्ग संवर्धन, स्वच्छता, चारित्र्यसंपन्नता आदी मानवी मूल्याचा विकास करण्याच्या हेतूने राबवल्या जाणाऱ्या या राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमाप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. सचिन हाटकर प्रा. डॉ. तुकाराम हापगुंडे उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. विलास आघाव यांनी उपस्थित स्वयंसेवकांना राष्ट्रीय सेवा योजना या व्यासपीठाचा उपयोग 'व्यक्तिमत्व विकास व व्यावसायिक सक्षमतेसाठी' केला पाहिजे असे मार्गदर्शन केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी महाविद्यालय परिसर व वनस्पती उद्यानमध्ये स्वच्छता, साफसफाई, प्लास्टिक संकलन, वृक्षरोपण, अशा विविध अंगी रूपाने श्रमदान करून योगदान दिले. श्रमदानानंतर राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना अल्पोहार व फळांचे वाटप करण्यात आले. श्रमदान कार्यक्रमात राष्ट्रीय सेवा योजना अधिकारी, राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी आणि कर्मचारी शेख जावेद व अशोक राखोंडे यांनी परिश्रम घेतले.

# आदर्शमध्ये जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेतील विजेत्यांचा सत्कार




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १० सप्टेंबर**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड आणि आदर्श महाविद्यालय हिंगोली यांच्या संयुक्त विद्यमाने मराठवाडा मुक्ती संग्राम दिन व स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ वर्धापन दिना निमित्त जिल्हास्तरीय निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. यामध्ये जिल्ह्यातील विविध महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवून, विध्यर्थाना अपेक्षित शिक्षणव्यवस्था या विषयावर आपली निबंध कला सादर केली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव, उपप्राचार्य प्रो. डॉ. संजीवकुमार नरवाडे, संयोजक डॉ. सोनलकुमार नगरकर, सांस्कृतिक समिती संयोजक प्रो. डॉ. बस्वराज लक्षटे तर आस्थापना प्रमुख कैलास डिडाळे उपस्थित होते.

सदर स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. सपना विठ्ठल केंद्रे आदर्श महाविद्यालय हिंगोली, द्वितीय क्रमांक, कु. खिल्लारी सलोनी गजानन तृतीय क्रमांक विभागुन, कु. साक्षी जनार्दन हरण आणि कु. रेणुका संतोष मांदळे तोष्णीवाल महाविद्यालय सेनगाव, यांनी प्राप्त केला. सदर स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. मारुती कोल्हे, डॉ. दंडवते डॉ.महेश्वर मंगनाळे यांनी कार्य पाहिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रो.डॉ. लक्षटे तर आभार प्रदर्शन प्रो.डॉ. प्रशांतकुमार जोशी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रा. कुशाल राठोड, डॉ. आकाश बांगर प्रा. परमेश्वर लोंढे प्रा. प्रभाकर शिंदे प्रा.कापुरे, संजय राठोड, बंडू ठाकूर, बाबा पठाण आणि जीवन मोरे यांनी परिश्रम घेतले.

# जिल्हास्तरीय वुशु स्पर्धेत शिरडशहापूरच्या खेळाडूंचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १० सप्टेंबर**

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, हिंगोली व हिंगोली जिल्हा वुशु असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय शालेय वुशु क्रीडा स्पर्धेचे आयोजन जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, लिंबाळा (म.) हिंगोली येथील बहुउद्देशीय सभागृहात करण्यात आले.

या स्पर्धेत जिल्हाभरातील विविध शाळांमधील १७ व १९ वर्षांखालील मुला-मुलींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. स्पर्धेत श्रीमती पी एफ बांगर विद्यालयाचे येथील १९ वर्षांखालील खेळाडू गणेश परडे यांनी व श्री शांति विद्यालयाचे आदित्य उबाळे येथील १९ वर्षांखालील खेळाडू आपल्या-आपल्या वजन गटात उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय कामगिरीमुळे त्यांची आगामी विभागीय शालेय वुशु क्रीडा स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

या खेळाडूंना प्रशिक्षक अनिल टाकणखार व रामभाऊ टाकणखार यांचे मार्गदर्शन लाभले.

स्पर्धेच्या प्रसंगी जिल्हा क्रीडा अधिकारी आत्माराम बोथीकर, क्रीडा अधिकारी गणेश बोडखे, क्रीडाधिकारी डॉ. निळकंठ श्रावण,आंतरराष्ट्रीयकुस्ती प्रशिक्षक प्रा. बंकट यादव, हिंगोली जिल्हा वुशु असोसिएशनचे सचिव संजय सौदा, हिंगोली वुशु प्रमुख गोपाल इसावे, शेख वसीम यांच्यासह क्रीडा क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. आदित्य उबाळे यांच्या यशाबद्दल श्री शांती विद्यालयाचे मुख्याध्यापक प्रशांत काळे व क्रीडा शिक्षक मुंजाजी चव्हाण आणि गणेश परडे यांच्या यशाबद्दल पी एफ बांगर विद्यालयाचे मुख्याध्यापक गजानन कुटे क्रीडा शिक्षक मेघराज सुर्यवंशी सर्व शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी, मार्शल आर्ट प्रशिक्षक संतोष नांगरे तसेच गावातील प्रतिष्ठित नागरिक व क्रीडाप्रेमींनी अभिनंदन करून विभागीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

# औंढा नागनाथ तालुक्यातील ग्रामपंचायतींचे ईश्वर चिठ्ठीने आरक्षण सोडत १० महिला ओबीसी, १० नागरिकांचा मागास प्रवर्ग, ७ सर्वसाधारण



**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १० सप्टेंबर**

तालुक्यातील २७ ग्रामपंचायतींच्या नागरिकांचा मागास प्रवर्ग (ओबीसी) आरक्षणाची सोडत बुधवारी (दि. ९) दुपारी १२ वाजता तहसील कार्यालय, औंढा नागनाथ येथे झाली .मागास प्रवर्गाचे आरक्षण सोडण्यात आले. यावेळी अनुश्री कैलास जाधव या चार वर्षाच्या मुलीच्या हाताने चिठ्ठ्या प्लास्टिक डब्यातून काढण्यात आल्या. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी यापूर्वी निश्चित झालेले आरक्षण मात्र कायम आहे.या आरक्षण पुढील प्रमाणे नागरिकांचा मागास प्रवर्ग सोडत ग्राम पंचायती आमदरी, नागेशवाडी, सोनवाडी, राजदरी, दरेगाव, ब्राह्मणवाडा, नागझरी, वसई,आजरसोंडा, बेरुळा, उंडेगाव, दोडगांव, बोरजा, नांदखेडा, काठोडा तांडा, लक्ष्मण नाईक तांडा, गांगलवाडी, जलालदाभा, काठोडा, काकडदाबा, पूर, सुकापुर, वडद, आसोदा, निशाणा, तामठी तांडा, चोंडी तर्फे शहापूर यापैकी नागरिकांचा मागास प्रवर्ग दरेगाव, नागझरी, बेरूळा, उंडेगाव, दोडगांव, बोरजा, नांदखेडा, काठोडा तांडा, लक्ष्मण नाईक तांडा, सोनवाडी तर नागरिकांचा मागास प्रवर्ग राखीव महिला पूर, वसई, आमदरी, ब्राह्मणवाडा, निशाणा, नागेशवाडी, राजदरी, काठोडा, जलालदाभा, आजरसोंडा तर सर्वसाधारण गांगलवाडी, काकडदाबा, सुकापुर, वडद, आसोंदा, कामठी तांडा, चोंडी तर्फे शहापूर या ग्रामपंचायतीचा समावेश आहे, अशी माहिती समन्वय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्या मार्गदर्शनाखाली आणि तहसीलदार हरीश गाडे यांनी दिली आहे.

ओबीसीच्या २७ जागापैकी ओबीसी १० जागा महिला राखीव, १० जागा नागरिकांचा मागास प्रवर्ग व ओबीसीच्या ०७ जागा ह्या सर्वसाधारण मध्ये टाकण्यात आले आहेत. तर एससी-एसटी आरक्षणाला धक्का नाही.अनुसूचित जाती (एससी) आणि अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गासाठी यापूर्वी काढण्यात आलेले आरक्षण कायम राहणार आहे. त्यामुळे ९ सप्टेंबरची प्रक्रिया केवळ नागरिकांचा मागास प्रवर्गाच्या आरक्षणापुरती होती.यावेळी तहसीलदार हरीश गाडे, नायब तहसीलदार प्रवीण जोशी, निवडणूक नायब तहसीलदार प्रभाकर काळे, सचिन शिरसागर, श्रीकृष्ण दराडे, इम्रान पठाण, विनोद घोडके कैलास जाधव, उमाकांत मुळे, गणेश जायभाय, विशाल भुक्तर यांच्यासह आरक्षण सोडतीच्या वेळी लोकप्रतिनिधी व नागरिकांनी उपस्थित होते. पोलीस निरीक्षक श्यामकुमार डोंगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पो कॉं ज्ञानेश्वर सावळे, अमोल चव्हाण, शंकर गव्हाणे यांनी बंदोबस्त ठेवला होता.

CMYK

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## 'कुणबी प्रमाणपत्रा'साठी महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १० सप्टेंबर : जिल्ह्यातील पात्र नागरिकांना कुणबी जात प्रमाणपत्र मिळणे सुलभ व्हावे, यासाठी १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत जिल्ह्यातील सर्व तालुक्यांमधील प्रत्येक महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजीनगर विभागीय आयुक्तांच्या निर्देशानुसार लातूर जिल्हा प्रशासनाने या विशेष मोहिमेचे नियोजन केले असून, अंतर्गत प्रत्येक महसूल मंडळात संबंधित तलाठी, ग्रामसेवक आणि मंडळ अधिकारी यांच्या संयुक्त पथकाद्वारे शिबिरांचे आयोजन करण्यात येणार आहे.

या शिबिरांचा दिनांक, वेळ व ठिकाण याची माहिती नागरिकांना वेळेत मिळावी यासाठी गावपातळीवर दवंडी देणे, ग्रामपंचायतीच्या नोटीस फलकावर सूचना प्रसिद्ध करणे तसेच स्थानिक व्हॉट्सप समूहांच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्याचे निर्देश प्रशासनाकडून देण्यात आले आहेत. आयोजित शिबिरांमध्ये जुन्या कुणबी नोंदी शोधणे, नागरिकांनी सादर केलेल्या पुराव्यांची प्रत्यक्ष पडताळणी करणे, नवीन अर्ज स्वीकारणे, आवश्यक कागदपत्रांची जुळवाजुळव करणे आणि परिपूर्ण अर्ज भरण्यासाठी नागरिकांना मार्गदर्शन व मदत करण्याची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. पात्र लाभार्थ्यांना जलद गतीने प्रमाणपत्र वितरीत व्हावे यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात येणार असून, कामकाजात पारदर्शकता आणि गतिमानता राखण्यासाठी उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ यांची जिल्हास्तरीय नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



## विविध वृत्त.....

### सराईत बुलेट चोरटा जेरबंद

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० सप्टेंबर : चोरलेल्या बुलेटचा चेसी नंबर व इंजिन नंबर खोडून वाहनाचा रंग बदलून बुलेट विक्रीसाठी थांबलेल्या चोरट्याला स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी लातूर-अंबाजोगाई रस्त्यावरील बोरवटीजवळ मंगळवारी जेरबंद केले. त्याच्याकडून चोरीची बुलेट जप्त केली.

आरोपी अंकुश बाबासाहेब नागरगोजे (वय २२, रा. घागरवाडा, ता. धारूर, जि. बीड) याची स्थानिक गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तपासणी केली असता माहिती मिळत नव्हती. अधिक चौकशी केली तर आरोपी अंकुश नागरगोजे याने त्याचा साथीदार सूरज बालासाहेब गायकवाड (रा. मोगरा, ता. माजलगाव, जि. बीड) याच्यासह फेब्रुवारी २०२५ मध्ये लातूर शहरातील साई मंदिर परिसरातून बुलेट चोरी केल्याचे सांगितले. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे. मोटारसायकलीचा मूळ रंग बदलण्यात आला होता. चेसी व इंजिनचा नंबर खोडण्यात आला होता. ती बुलेट आरोपीकडून जप्त करण्यात आली. आरोपी नागरगोजेविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात फरार असल्याची नोंद आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग माने, अंमलदार विनोद चलवाड, रसूल पठाण, प्रशांत स्वामी, राजेश कंचे, गोविंद यलमटे, आनंद हल्लाळे, प्रेमदास राठोड, चंद्रकांत केंद्रे यांनी केली.

# विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय रुग्णालयातील विविध प्रलंबित कामांना गती देण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांच्या सूचना

तभा वृत्तसेवा

लातूर, दि. १० सप्टेंबर : येथील विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रूग्णालयातील विविध विकासकामांबाबत जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक झाली. रुग्णालयातील सेवा, सुरक्षा आणि पायाभूत सुविधांशी संबंधित विविध मुद्द्यांचा आढावा घेवून संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना त्यांनी यावेळी दिल्या.




महाविद्यालयाच्या परिषद दालनात झालेल्या या बैठकीला लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता बाबासाहेब थोरात, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. टेकाळे, भूमि अभिलेख विभागाच्या जिल्हा अधीक्षक नसीम पटेल, राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कार्यकारी अभियंता अशोक जाधव, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता श्री. नरवडे आणि अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी यांच्यासह संबंधित इतर विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

बैठकीदरम्यान रुग्णालयातील विविध कामांचा आढावा घेताना दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी जागा उपलब्ध करून देण्याबाबत शासन स्तरावर प्रस्ताव सादर करण्यात आल्याचे सांगण्यात आले. प्रशिक्षण केंद्राची जागा लवकरात लवकर दिव्यांग पुनर्वसन केंद्रासाठी वर्ग करण्यात येईल, असे जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी स्पष्ट केले. महाविद्यालय परिसरात जिल्हा नियोजन समितीच्या निधीतून फायर स्टेशन उभारण्यासाठी तातडीने संबंधित प्रस्ताव सादर करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या. तसेच, रुग्णालयात अग्निसुरक्षेच्या दृष्टीने अग्निशमन विभागामार्फत सातत्याने 'मॉक ड्रिल' आयोजित करण्यात यावे, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी यावेळी सांगितले.

महाविद्यालय आणि रुग्णालयाशी संबंधित सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत सुरू असलेली सर्व प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करावीत. रुग्णालय परिसरात उभारण्यात येणाऱ्या माता बाल रुग्णालय तसेच क्रिटिकल केअर हॉस्पिटलच्या कामाची गती वाढवून ही कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावीत. या कामांसाठी आवश्यक असलेल्या निधीचा प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियानाचे कार्यकारी अभियंता यांना देण्यात आले.

रुग्णालय परिसरातील कचरा वेळोवेळी उचलला जावा आणि परिसरात फिरणाऱ्या मोकाट डुकरांचा व कुत्र्यांचा त्वरित बंदोबस्त करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी महानगरपालिका अधिकारीकाऱ्यांना दिल्या. यावर रुग्णालयाला २४ तास पाणीपुरवठा करणे तसेच वसतीगृह, महाविद्यालय आणि इतर विभागांसाठी स्वतंत्र मिटर बसवून पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्यात येईल, असे महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी बैठकीत सांगितले.

### बुध्द विहार हे संस्कार केंद्र : पय्यानंद थेरो




तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० सप्टेंबर : बुद्धविहार म्हणजे केवळ उपासनेचे ठिकाण नव्हे, तर प्रत्येकाच्या विचारांना दिशा देणारे, मूल्यांची जडणघडण करणारे आणि सामाजिक बांधिलकीची जाणीव निर्माण करणारे संस्कार केंद्र आहे, असे प्रतिपादन भंते पयानंद थेरो यांनी केले.

येथील राजा सिद्धोधन बुद्धविहारात वर्षावास कार्यक्रम समारोपानिमित्त आयोजित धम्मदेशना कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी काँग्रेसचे नेते भालचंद्र सोनकांबळे, दीपरत्न निलंगेकर, व्ही. एस. पँथरचे विनोद खटके, आनंद सोनवणे उपस्थित होते. भंते पयानंद म्हणाले, तथागत गौतम बुद्धांच्या तत्त्वज्ञानातील मध्यममार्ग महत्त्वाचा आहे. अतिरेक टाळून विवेक, करुणा, प्रज्ञा आणि नैतिक मूल्यांच्या आधारे जगण्याचा मार्ग म्हणजे बुद्धांनी दाखविलेला मध्यममार्ग आहे. जीवनातील खरा आनंद हा केवळ भौतिक संपत्तीत शोधता येत नाही. पैसा आवश्यक असला तरी मूल्य, माणुसकीला अधिक महत्त्व आहे, हा बोध तथागतांच्या धम्मातून मिळतो, असे ते म्हणाले.

यावेळी राजा शुद्धोधन ट्रस्टचे विक्रम चिकटे, दगडू साळवे, सूर्यकांत दांडे, हेमंत जाधव, गौतम सूर्यवंशी, धम्मरत्न सोनवणे, किशोर सूर्यवंशी, प्रकाश कांबळे, रवी कांबळे, अंकुश पाटोळे यांसह महिला, नागरिक उपस्थित होते.

## शहाजी उमाप यांच्याकडे २३ तक्रारदारांच्या तक्रारी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० सप्टेंबर : लातूर जिल्ह्याच्या कामगिरीचा मासिक आढावा घेण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप हे सकाळपासून पोलीस अधीक्षक कार्यालयात उपस्थित होते. दुपारी ३ ते ५ या वेळेत त्यांनी जिल्ह्यातील तक्रा-रदारांशी 'संवाद' साधला. यादरम्यान २३ तक्रारदारांनी आपले लिखित अर्ज पोलीस उप महानिरीक्षक उमाप यांना सोपविले. यात, मालमत्ता विषयक वाद, मारहाण, दाखल गुन्ह्यांचा तपास, सायबर फसवणूक, पोलीस संरक्षण, कौटूंबिक वाद, अवैध व्यवसाय इत्यादी तक्रारींचा समावेश आहे. प्राप्त तक्रारींची गांभीर्याने दखल घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीसाठी संबंधित उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आवश्यक त्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी पोलीस अधीक्षक कार्यालय, लातूर येथे जिल्ह्यातील तक्रारदारांशी संवाद साधला. आपल्या जिल्हा भेटी दरम्यान, नागरिकांच्या अडीअडचणी समजावून घेऊन, त्यांच्या शिघ्र सोडवणुकीद्वारे पोलीस-नागरिक यांच्यातील 'संवाद' मजबूत करून, लोकाभिमुख कामकाजाद्वारे पोलीस जनता संबंध अधिक दृढ करण्यासाठी पोलीस उप महानिरीक्षक उमाप यांनी नांदेड परिक्षेत्रातील चारही जिल्ह्यांत 'जनसंवाद' उपक्रम सुरू केला आहे.

तक्रारदारांकडून प्राप्त होणाऱ्या अर्जाच्या शिघ्र सोडवणुकीसाठी, पोलीस उप महानिरीक्षक कार्यालयाने यापूर्वीच 'संवेदना' ही तक्रार निवारण प्रणाली स-रू केली आहे. आज रोजी 'जनसंवाद' उपक्रमादरम्यान, प्राप्त झालेले सर्व अर्ज 'संवेदना' पोर्टलच्या माध्यमातून पुढील चौकशी व कार्यवाहीसाठी संबंधित अधिकाऱ्यांकडे वर्ग करण्यात येणार असून, प्रत्येक तक्रारीवर झालेल्या कार्यवाहीचा आढावा नांदेड परिक्षेत्र कार्यालयातील फीडबॅक टीममार्फत घेण्यात येणार आहे.

### औसेकर महाराजांच्या कुटुंबांचे पोलिस उपमहानिरीक्षक उमाप यांच्याकडून सांत्वन



तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० सप्टेंबर : नाथ संस्थान औसा येथील पिठाचे पिठाधिपती सद्‌गुरू गुरुबाबा औसेकर व विठ्ठल मंदिर संस्थानचे सह कार्याध्यक्ष सद्‌गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या मातोश्री लिलाबाई ज्ञानेश्वर महाराज औसेकर यांचे काही दिवसापूर्वी निधन झाले होते. बुधवारी लातूर दौऱ्यावर असलेले पोलिस महानिरीक्षक शहाजी उमाप यांनी औसा येथील औसेकर महाराज यांच्या निवासस्थानी भेट देऊन सद्‌गुरू गुरुबाबा औसेकर सद्‌गुरू गहिनीनाथ महाराज औसेकर यांच्या कुटुंबाचे सांत्वन केले.

याप्रसंगी मच्छिंद्र महाराज औसेकर, कुरेशी समाजाचे अध्यक्ष नसीर कुरेशी, राजू पाटील, इलियास चौधरी आदी उपस्थित होते.

### विहिरीत पडल्याने तरुणाचा बुडून मृत्यू

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १० सप्टेंबर : शेतातील विहिरीत पडून पाण्यात बुडाल्याने एका ३७वर्षीय तरुणाचा मृत्यू झाल्याची घटना बुधवारी (दि. ९) सकाळी नरसिंगवाडी (ता. उदगीर) येथे घडली आहे.

उदगीर ग्रामीण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नामदेव पांडुरंग कोलेवाड (वय ३७, रा. नरसिंगवाडी) असे मृताचे नाव आहे, बधवारी सकाळी साडेआठ वाजण्याच्या सुमारास नरसिंगवाडी येथील धोंडीराम नामदेव कोलेवाड यांच्या शेतातील विहिरीत पाडून पाण्यात बुडाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

### स्वच्छ वायू सर्वेक्षणमध्ये लातूरची दमदार कामगिरी लातूरकरांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित : आयुक्त कुलकर्णी

तभा वृत्तसेवा

लातूर दि. १० सप्टेंबर : स्वच्छ हवा आणि पर्यावरण संवर्धनाच्या दिशेने लातूर महानगरपालिका प्रशासनाकडून करण्यात येत असलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांना राष्ट्रीय स्तरावर महत्त्वपूर्ण यश मिळाले आहे. स्वच्छ वायू सर्वेक्षण-२०२६ मध्ये ३ ते १० लाख लोकसंख्या असलेल्या शहरांच्या श्रेणीत लातूर ने १८८.५ गुण मिळवत देशात ७ वा क्रमांक प्राप्त केला आहे.

शहरातील रस्त्यांवरील धूळ नियंत्रण, यांत्रिक पद्धतीने रस्ते सफाई, कचरा व जैविक कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन, हरित क्षेत्रात वाढ, पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन तसेच नागरिकांमध्ये वायुप्रदूषणाबाबत जनजागृती या विविध उपाययोजनांचा लातूरच्या कामगिरीत महत्त्वाचा वाटा आहे. लातूरचा २०२६ साली राष्ट्रीय स्तरावर ७ वा क्रमांक आला आहे. वर्ष २०२४ मध्ये ३१ वा आणि २०२५ मध्ये २४ वा क्रमांक होता. ही उल्लेखनीय कामगिरी लातूर शहरातील नागरिक, स्वच्छता कर्मचारी, विविध शासकीय विभाग तसेच पर्यावरण संवर्धनासाठी कार्यरत संस्था यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फलित आहे असे मत आयुक्त राहुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

स्वच्छ हवा, निरोगी लातूर हीच आपली सामूहिक जबाबदारी ! या संकल्पनेनुसार यापुढेही शहरातील वायू गुणवत्तेत सुधारणा करण्यासाठी प्रदूषणाच्या प्रमुख स्रोतांवर प्रभावी नियंत्रण, हरित क्षेत्राचा विस्तार, स्वच्छता व्यवस्थेचे बळकटीकरण आणि नागरिकांचा सक्रिय सहभाग यावर विशेष भर देण्यात येणार आहे.

## कॉंग्रेस शिष्टमंडळाकडून सुकलेल्या सोयाबीनची पाहणी तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची मागणी



तभा वृत्तसेवा

निलंगा दि. १० सप्टेंबर : गेल्या दीड महिन्यापासून पावसाने मोठा खंड दिल्याने खरीप हंगामातील पिके धोक्यात आली आहेत. विशेषतः सोयाबीन पिकाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी आर्थिक संकटात सापडला आहे. या गंभीर परिस्थितीची कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके यांच्या प्रमुख उपस्थितीत कॉंग्रेसच्या शिष्टमंडळाने निलंगा तालुक्यातील उमरगा (हा) येथील नुकसानग्रस्त शेतीची पाहणी करून तात्काळ दुष्काळ जाहीर करण्याची मागणी निवेदनाद्वारे शासनाकडे केली आहे.

पाहणीदरम्यान शेतकऱ्यांशी संवाद साधताना अभय साळुंके म्हणाले, पावसाळा संपत आला तरी जिल्ह्यात सोयाबीन, मोसंबी, केळी, ऊस, ज्वारी यासह विविध पिकांवर पावसाअभावी परिणाम झाला आहे. तलाव, छोटे जलसाठे कोरडे पडत असून विहिरींच्या पाणीपातळीतही घट झाली आहे. त्यामुळे शेतीसोबतच पशुधनासाठी चारा व पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. या पार्श्वभूमीवर शासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये नुकसानभरपाई जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

**तर वेळप्रसंगी हातात दंडुके घेऊ : अभय साळुंके**

जगाचा पोशिंदा संबोधला जाणारा शेतकरी आडचण सापडला असताना सरकार मुग गिळून गप्प आहे. दररोज शेतकरी गळफास घेऊन आपले जीवन संपवत आहेत. आणखीन किती जीव जाण्याची सरकार वाट बघत आहे. आठ दिवसांत शेतकरी हिताचे पॅकेज जाहीर करावे अन्यथा कॉंग्रेस रस्त्यावर उतरून हातात दंडुके घेऊन आंदोलन करेल जे सरकारला परवडणार नाही असा इशारा अभय साळुंके यांनी दिला

तसेच सोयाबीनसह इतर खरीप पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करावे व पावसाचा दीर्घ खंड लक्षात घेता पीकविमा नियमांमध्ये आवश्यक बदल करून शेतकऱ्यांना विम्याची नुकसानभरपाई मिळण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी. तसेच शेतकरी व शेतमजुरांना रेशनची व्यवस्था, पशुधनासाठी चारा छावण्या आणि पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी करत आठ दिवसात निर्णय घेतला नाही आंदोलन करु असा इशारा देण्यात आला. पाहणीनंतर उपविभागीय अधिकारी यांना निवेदन देण्यात आले.

यावेळी तालुकाध्यक्ष विजयकुमार पाटील, जिल्हा उपाध्यक्ष सुधाकर पाटील, डॉक्टर सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ अरविंद, माजी प.स.सभापती अजित माने, माजी नगराध्यक्ष हमीद शेख, जि.प.सदस्य प्रतिनिधी प्रमोद मरुरे, प.स.सदस्य किरण पाटील, श्रीमंत जाधव, अभिजित उसनाळे, नगरसेवक अजित नाईकवाडे, सिराज देशमुख, प्रशांत वांजरवाडे, गणेश पेठकर, आंबादास जाधव, विठ्ठल पाटील, गंगाधर चव्हाण, किशोर कारखाने, माधवराव पाटील, विकास पाटील, चक्रधर शेळके, बालाजी गोमसाळे, प्रा. रमेश मदरसे, अमोल बिराजदार, माधव वाडीकर, महेश तिवारी, गौतम सोनकांबळे आदी उपस्थित होते.

## दिलीपराव देशमुख लातूरची ऑक्सफोर्ड डिक्शनरी : सहकार मंत्री बाबासाहेब पाटील

तभा वृत्तसेवा

शिरूर अनंतपाळ दि. १० सप्टेंबर : दिलीपराव देशमुख लातूरची ऑक्सफोर्ड डिक्शनरी असून त्यांच्याकडे प्रत्येक समस्येचे निराकरण असून त्याचबरोबर अनेक विविध संकल्पना असून त्याच माध्यमातून लातूर जिल्ह्यातील सहकार, बँक,शिक्षण अशा सर्व व्यवस्थेला मूर्त स्वरूप देण्याचे काम दिलीपराव देशमुख यांनी केलं असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी शिरूर अनंतपाळ येथे केले.




शिरूर अनंतपाळ येथे श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय च्या वतीने दिलीपराव देशमुख यांनी मांजरा परिवारातील अनेक कारखान्यांना उच्चांकी दर दिल्याबद्दल त्यांचा गौरव समारंभ तसेच ग्रंथ रसिक या ग्रंथाचे प्रकाशन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी ते बोलत होते.

ते पुढे बोलताना सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले की, दिलीपराव देशमुख व माझा स्नेह ४० वर्षापासून असून आम्ही जिल्हा परिषद व बँकेत व सहकारात एकत्र काम केलं असून राज्यात सर्वाधिक सहवास मला त्यांचा मिळाला आहे.

दिलीपराव देशमुख यांचा हा सत्कार हा त्यांचा नसून त्यांनी ज्या घटकाला आतापर्यंत न्याय दिला त्या सर्वांचा हा सन्मान असून दिलीपराव देशमुख दूरदृष्टी असलेले एक नेतृत्व असून एखादी संस्था सुरू करणे हे सोपं असतं मात्र त्या संस्थेला यशस्वीपणे चालवणे अवघड असतं परंतु ही अवघड प्रक्रिया सुद्धा दिलीपराव देशमुख यांनी सोपी करत आजही अव्याहतपणे ते समाजसेवेमध्ये कार्यरत आहेत.

चाळीस वर्षाच्या कार्याचा गौरव म्हणूनच त्यांना सहकार भूषण पुरस्काराने गौरवल्याचे सुद्धा सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक या कार्यक्रमाचे आयोजक एल बी आवाळे यांनी केले. यावेळी त्यांनी कार्यक्रमाची भूमिका विशद केली. यावेळी गौरव ग्रंथाचे संपादक जयद्रथ जाधव, ग्रंथ संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागोराव कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार बालाजी जाधव यांनी मानले.

सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील यांचे भाषण म्हणजे माझ्या कार्याची पावती : दिलीपराव देशमुख सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांनी ज्या भावना त्यांच्या भाषणातून व्यक्त केल्या ह्याच माझ्या कार्याची पावती असून शिरूर अनंतपाळकरांनी केलेला सन्मान हा अत्यंत भावनिक सन्मान आहे,

व्यासपीठावर सत्कारमूर्ती दिलीपराव देशमुख,राज्य साखर संघ संचालक आबासाहेब पाटील सेलूकर, बंडाप्पा काळगे, प्राचार्य नागोराव कुंभार, डी.एन शेळके, डॉ.जयदत्त जाधव, प्रभाकरराव कुलकर्णी, संभाजीराव पाटील, एल बी आवाळे अनंतराव देशमुख, विठ्ठलराव पाटील,प्रवीण पाटील,महादेव आवळे अमर आवळे जयेश माने संदीप धुमाळे तुकाराम पारवे, सुधीर लखन गावे दिलीप पाटील, आर. आर पाटील, लक्ष्मणराव बोधले, डॉ राजकुमार बोपलकर, डॉ.अरविंद भातांबरे, ग्रंथ रसिक लातूर जिल्हा, मराठी साहित्य संमेलन महाराष्ट्र राज्य, साहित्य आणि संस्कृती मंडळ व श्री अनंतपाळ नवयुवक वाचनालय व ग्रंथ प्रकाशन सोहळाचे सर्व मान्यवर, महिला भगिनी, त्यासोबतच तालुकाभरातून अनेक शेतकऱ्यांनी या कार्यक्रमासाठी उपस्थिती लावण्यात आली.

# गुप्तधनासाठी देवस्थानातच खोदकाम !

## आप्पारावपेठेत शिवलिंग व नंदी असलेल्या श्रद्धास्थळावर अंधश्रद्धेचा धक्कादायक प्रकार

**तभा वृतसेवा**
**इस्लापूर, दि. १० सप्टेंबर -**

गुप्तधन मिळविण्याच्या हव्यासापोटी अंधश्रद्धेचा कळस गाठत थेट देवस्थान परिसराचीच नासधूस केल्याचा धक्कादायक प्रकार किनवट तालुक्यातील आप्पारावपेठ येथील मंदाबोगडा परिसरात उघडकीस आला आहे. शिवलिंग व नंदी असलेल्या श्रद्धास्थळावर लिंबू ठेवून जेसीबीच्या साह्याने खोदकाम करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने भाविक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

पोलीस नोंदीनुसार, दि. २७ ऑगस्ट रोजी रात्री ११ वाजेपासून दि. २८ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत मंदाबोगडा परिसरात हा प्रकार घडला. येलय्या सयान्ना अंबाकन्टी, रा. आप्पारावपेठ, याच्यासह इतर साथीदारांनी गुप्तधन मिळेल या अंधश्रद्धेतून शिवलिंग व नंदी असलेल्या जागेवर लिंबू ठेवून जेसीबीच्या साह्याने खोदकाम करून परिसराची नासधूस केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

विशेष म्हणजे, दसऱ्याच्या दिवशी भाविक ज्या ठिकाणी श्रद्धेने पूजा-अर्चा करतात, त्याच पवित्र स्थळाला गुप्तधनाच्या लालसेने लक्ष्य करण्यात आले. त्यामुळे धार्मिक आस्था आणि गावच्या परंपरेला धक्का बसल्याची भावना ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. श्रद्धास्थळावर चक्क जेसीबी फिरविण्यापर्यंत अंधश्रद्धेची मजल गेल्याने या घटनेने परिसर हादरला आहे.

**लिंबू ठेवून 'गुप्तधना'चा शोध?**

गुप्तधनाच्या शोधासाठी लिंबू आणि धार्मिक प्रतीकांचा वापर करून खोदकाम करण्यात आल्याचा प्रकार समोर आल्याने ग्रामीण भागातील अंधश्रद्धेचे गांभीर्य पुन्हा अधोरेखित झाले आहे. पैसा मिळविण्याच्या हव्यासापोटी धार्मिक स्थळालाच लक्ष्य करणे ही केवळ कायद्याची बाब नसून समाजाच्या श्रद्धा आणि सामाजिक सलोख्यालाही धक्का देणारी घटना असल्याची भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे.

या प्रकरणी भोजा रेड्डी मल्ला रेड्डी नुतुल (वय ५३, व्यवसाय शेती, रा. आप्पारावपेठ) यांनी इस्लापूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यावरून इस्लापूर पोलिसांनी गुन्हा रजि. नं. १२३/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहितेतील कलम २९८, २९९, ३०३(२), ३२४(५), ३(५) तसेच महाराष्ट्र नरबळी व इतर अमानुष, अनिष्ट व अघोरी प्रथा व जादूटोणा प्रतिबंध व निर्मूलन अधिनियम, २०१३ चे कलम ३(२) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

**पुन्हा असे प्रकार घडल्यास कठोर कारवाई**

दरम्यान, अशा प्रकारच्या अंधश्रद्धेतून धार्मिक स्थळांची नासधूस अथवा गुप्तधनाच्या नावाखाली खोदकाम करण्याचे प्रकार यापुढे घडू नयेत, यासाठी पोलिसांकडून कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर यांनी स्पष्ट केले. अशा प्रकारची कृत्ये पुन्हा घडल्यास संबंधितांवर कायद्यानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देशही त्यांनी दिले.

या घटनेमागे नेमका उद्देश काय होता, खोदकामासाठी जेसीबीचा वापर कशाप्रकारे करण्यात आला आणि या प्रकारात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोहेकॉ ६५८ केंद्रे यांनी केली असून, पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक रमेश जाधवर करीत आहेत.

भाविकांच्या श्रद्धेचे केंद्र असलेल्या ठिकाणी अंधश्रद्धेच्या नावाखाली जेसीबीने खोदकाम होणे ही बाब अत्यंत गंभीर आहे. गुप्तधनाच्या हव्यासापोटी देवस्थानच उकरणाऱ्यांना कायद्याचा धाक बसणे गरजेचे असून, या घटनेचे संपूर्ण सत्य तपासातून समोर यावे, अशी अपेक्षा भाविक आणि ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे.

# डीजेमुक्त गणेशोत्सव साजरा करा, अन्यथा कारवाई : प्रशांत शिंदे

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १० सप्टेंबर -**

नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे सिडको येथे आगामी सण उत्सवानिमित्त शांतता कमिटीची बैठक दिनांक ९ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता घेण्यात आली. यावेळी पोलीस उपविभागीय अधिकारी इतवारा प्रशांत शिंदे यांनी सर्व गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांना मार्गदर्शन करताना बोलत होते. गणेश उत्सवात कसल्याच प्रकारचे डीजे वाजवण्यास सक्त बंदी असल्याने एकही गणेश मंडळ डीजे वाजवणार नाही याची जबाबदारी स्वतःच घ्यावी. जर डीजे लावल्यास कार्यवाहीस सामोरे जावे लागेल असा इशारा देण्यात आला आहे.

नांदेड ग्रामीण पोलीस स्टेशन हद्दीतील सिडकोसह सर्वच ग्रामीण भागातील गणेश मंडळाच्या पदाधिकारी व प्रत्येक गावचे पोलीस पाटील यांना बोलावून घेऊन ग्रामीण पोलीस ठाणे सिडको येथे दिनांक ९ सप्टेंबर रोजी शांतता कमिटीची बैठक घेण्यात आली.




ही बैठक पोलीस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. तेव्हा यावेळी ओमकांत चिंचोलकर यांनी सर्व गणेश मंडळांच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांना खडसावून सांगितले की जर गणेश उत्सवात डिजे दिसला तर त्यांच्यावर कडक कार्यवाही केली जाईल. गणेश उत्सवात पारंपारिक वाद्यांचा समावेश करून ढोल ताशांच्या गजरात आपला उत्सव साजरा करावा असेही सांगण्यात आले. तसेच यावेळी इतवारा विभागाचे पोलीस विभागीय अधिकारी प्रशांत शिंदे यांनीही येणाऱ्या गणेश उत्सवात कोणत्याही गणेश मंडळांनी डीजे लावू नये यासंदर्भात कोणतेही कारण ऐकून घेतले जाणार नाही. याची गणेश मंडळांनी नोंद घ्यावी. या उत्सवा दरम्यान पारंपारिक वाद्य ढोल ताशांच्या गजरात गणेश उत्सव आनंदाने साजरा करा, असे आव्हान केले. यावेळी या बैठकीस ग्राम ीण ठाण्याचे सपोनी वसंत मुळे, सपोउपनि आनंत चव्हाण, स्वप्निल साळुंखे, प्रादेशिक परिवहन अधिकारी स्वप्निल चव्हाण ,अग्निशमन दलाचे अधिकारी विकास माने, महानगरपालिकेचे जयराम सूर्यवंशी, महावितरणचे साखरे साहेब यांची उपस्थिती होती तर सदरील बैठक यशस्वी करण्यासाठी गोपनीय शाखेचे बालाजी दंतापल्ले व बाळासाहेब टर्के यांनी परिश्रम घेतले.

### मुदखेड येथे भव्य दहीहंडीचे आयोजन गोविंदा पथकांना सहभागाचे आवाहन

**मुदखेड** -मुदखेड शहरात हनुमान चालीसा समितीच्या वतीने भव्य दहीहंडी उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षी या दहीहंडी उत्सवाचे दुसरे वर्ष असून, हा भव्य कार्यक्रम शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी गणपती मंदिर, मोंढा मैदान, मुदखेड येथे आयोजित करण्यात आला आहे. या भव्य दहीहंडी उत्सवाला माजी मुख्यमंत्री तथा राज्यसभा खासदार मा. अशोकराव चव्हाण यांची प्रमुख उपस्थिती लाभणार असून, त्यांच्या प्रमुख उपस्थितीत कार्यक्रमाची सुरुवात होणार आहे. या दहीहंडी उत्सवामध्ये जिल्हाभरातील विविध गोविंदा पथके सहभागी होणार आहेत. दहीहंडी फोडणाऱ्या विजेत्या गोविंदा पथकासाठी मुदखेड नगरीच्या नगराध्यक्षा सौ. विश्रांतीताई माधव कदम यांच्या वतीने ३३ हजार ३३३ रुपयांचे पारितोषिक ठेवण्यात आले आहे. दहीहंडी उत्सव अधिक उत्साहात आणि भव्य स्वरूपात साजरा करण्यासाठी जिल्हाभरातील तसेच परिसरातील गोविंदा पथकांनी जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन हनुमान चालीसा समितीच्या वतीने करण्यात आले आहे.

### हाणेगाव येथे मुस्लिम समाजाच्या शादीखान्याचे भूमिपूजन

**हाणेगाव** - हाणेगाव येथील मुस्लिम समाजासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या शादीखान्याच्या बांधकामाचे भूमिपूजन लोकनेते तथा खासदार खा. रविंद्र पाटील चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. मुस्लिम समाजाच्या सामाजिक व कौटुंबिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र व सुसज्ज जागेची आवश्यकता अनेक दिवसांपासून जाणवत होती. ही गरज लक्षात घेऊन जामा मस्जीद येथे शादीखान्याच्या उभारणीचा



मार्ग मोकळा झाल्याने समाजबांधवांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे. भूमिपूजनप्रसंगी बोलताना खा. रविंद्र पाटील चव्हाण यांनी, समाजातील सर्व घटकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे आणि सर्वसमावेशक विकास साधणे हीच आमची भूमिका आहे, असे प्रतिपादन केले. शादीखान्यामुळे मुस्लिम समाजातील विवाहसोहळे तसेच विविध सामाजिक कार्यक्रमांसाठी चांगली सुविधा उपलब्ध होणार असल्याचे त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास मुस्लिम समाजातील ज्येष्ठ नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पदाधिकारी, ग्रामस्थ व विविध मान्यवरांची म ोठ्या संख्येने उपस्थिती होती. भूमिपूजनानंतर उपस्थित समाजबांधवांनी आनंद व्यक्त करत या विकासकामासाठी पुढाकार घेतल्याबद्दल खा. रविंद्र पाटील चव्हाण यांचे आभार मानले. हाणेगावच्या विकासाच्या दृष्टीने हे काम महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, शादीखान्याच्या उभारणीकडे आता ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## डासांचा वाढता उपद्रव रोखण्यासाठी देगलूर नगरपरिषदेची धूरफवारणी मोहीम

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १० सप्टेंबर -**

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील विविध भागांत डासांचा प्रादुर्भाव वाढू नये, तसेच डेंग्यू, मलेरिया यांसारख्या आजारांपासून नागरिकांचे संरक्षण व्हावे, यासाठी देगलूर नगरपरिषदेने गेल्या पंधरा दिवसांपासून शहरातील विविध भागांत धूरफवारणीची विशेष मोहीम हाती घेतली आहे.

नगरपरिषदेच्या कर्मचाऱ्यांकडून शहरातील विविध प्रभाग, रहिवासी परिसर, गल्लया तसेच डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता असलेल्या ठिकाणी नियोजनबद्ध पद्धतीने धूरफवारणी केली जात आहे. सायंकाळच्या वेळेत अनेक भागांत फवारणी करण्यात येत असल्याने डासांचा उपद्रव कमी करण्यास मदत होत असल्याचे नागरिकांकडून सांगण्यात येत आहे.



पावसाळ्यात साचलेले पाणी, नाले-गटारे आणि अस्वच्छ परिसरामुळे डासांची उत्पत्ती होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे केवळ धूरफवारणीवर अवलंबून न राहता नागरिकांनी घराभोवती पाणी साचू न देणे, परिसर स्वच्छ ठेवणे आणि नगरपरिषदेला आवश्यक त्या ठिकाणी माहिती देणे गरजेचे आहे. शहरातील सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजनांना गती देत नगरपरिषदेने सुरू केलेल्या या मोहिमेमुळे नागरिकांना काहीसा दिलासा मिळत असून, उर्वरित भागांतही नियमित धूरफवारणी करण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## शिक्षक दिन साजरा

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १० सप्टेंबर -**

येथील जिव्हाळा निवासी दिव्यांग विद्यालय व सौ. गजराबाई वडगांवकर निवासी मूकबधिर विद्यालय येथे आज डॉ.सर्वपल्ली राधाकृष्णन यांची जयंती (शिक्षक दिन) साजरा करण्यात आली.

कार्यक्रमाच्या अध्यक्षा म्हणून मुख्याध्यापिका नरवाडे कमल तर प्रमुख पाहूणे म्हणून मुख्याध्यापक जाधव सुभाष गोविंदराव, बालाजी जाधव,उपस्थित होते. या वेळी उपस्थितानी विद्यार्थ्यांना शिक्षक दिन या विषयावर सखोल मार्गदर्शन केले या वेळी हाश्मी , मुसा , राठोड तुकाराम, रेनगुंटवार व्यंकट, पठाण न्यूरखा, नळगीरे अविनाश, पांचाळ बाबुराव, सुडके देविदास, शिवाजी कदम, बिरादार संजय, सौ मठदेवरू रंजना, सौ.भिका आशा, जिवने ब्रिजेश यांच्या सह कर्मचारी विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## हदगाव शहरात राधाकृष्ण विखे पाटील यांच्या बॅनरची तोडफोड

**तभा वृतसेवा**
**हदगाव, दि. १० सप्टेंबर -**

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी अंतरवाली सराटी येथे मनोज जरांगे पाटील गेल्या बारा दिवसांपासून आमरण उपोषणाला बसले आहेत. मात्र, शासनाकडून अद्याप कोणतीही ठोस पावले उचलण्यात आलेली नाहीत. यातच आरक्षण समितीचे अध्यक्ष तथा जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी आता आमच्याजवळचे पर्याय संपले आहेत, तुम्हीच तुमचे पर्याय सांगावे,असे वक्तव्य केल्यामुळे सकल मराठा समाज संतप्त झाला आहे.

या विधानाचा निषेध करत हदगाव येथील सकल मराठा बांधवांनी सकाळी रस्त्यावर उतरून जोरदार निदर्शने केली. यावेळी शहरात लावण्यात आलेल्या जलसंपदा मंत्र्यांच्या बॅनरची आंदोलकांनी तोडफोड करत तीव्र रोष व्यक्त केला. मंत्र्यांनी मराठा समाजाचा विश्वासघात केला




असून शेवटच्या क्षणी हात वर केल्याचा आरोप आंदोलकांनी केला. मनोज जरांगे पाटील तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ है अशा जोरदार घोषणा देत संपूर्ण परिसर दणाणून सोडण्यात आला. राज्य सरकार केवळ वेळकाढू धोरण राबवून दिवस ढकलत असल्याचा संताप यावेळी व्यक्त करण्यात आला.मराठा समाजाला जोवर हक्काचे आरक्षण मिळत नाही, तोपर्यंत हा लढा असाच सुरू राहणार असून शासनाच्या भूमिकेविरोधात आंदोलने अधिक तीव्र करण्याचा इशारा यावेळी मराठा बांधवांनी दिला.

## हिमायतनगर तालुक्यात कुणबी मराठा जात प्रमाणपत्रासाठी विशेष शिबिर

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १० सप्टेंबर -**

कुणबी जात प्रमाणपत्राच्या वितरण प्रक्रियेला गती देण्यासाठी हिमायतनगर तालुक्यात महसूल विभागाच्या वतीने १० ते १७ सप्टेंबर २०२६ या कालावधीत विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील जवळगाव, सरसम आणि हिम ायतनगर या तीन महसूल मंडळांत ही शिबिरे घेण्यात येणार असून, संबंधित गावांतील पात्र नागरिकांनी या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या कार्यालयाच्या वतीने करण्यात आले आहे.

शासनाच्या निर्देशानुसार कुणबी जात प्रमाणपत्रांच्या वितरणासाठी महसूल मंडळ स्तरावर विशेष शिबिरे घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी महसूल मंडळ अधिकारी, संबंधित सजाचे ग्राम महसूल अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी तसेच कृषी सहाय्यक यांच्या समन्वयातून शिबिरांची

अंमलबजावणी केली जाणार आहे. त्यात तहसीलदार पल्लवी टेमकर यांच्या म ार्गदर्शनाखाली तालुका प्रशासनाने या विशेष मोहिमेचे सूक्ष्म नियोजन केले आहे. जवळगाव येथे जगदंबा मंदिर, जवळगाव येथे दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी विशेष शिबिर घेण्यात येणार आहे. या शिबिरात जवळगाव, काम ारी, काडली बु. तसेच संबंधित गावांतील नागरिकांना मार्गदर्शन व आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यानंतर सरसम येथे १५ सप्टेंबरला ग्रामपंचायत कार्यालय, सरसम बु. येथे शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. सरसम सह आदी गावांतील नागरिकांना या शिबिराचा लाभ घेता येणार आहे. त्यानंतर हिमायतनगर येथे १६ सप्टेंबरला विशेष शिबिर हिमायतनगर महसूल मंडळातील नागरिकांसाठी हुतात्मा जयवंतराव पाटील विद्यालय, हिम ायतनगर येथे

घेण्यात येणार आहे. हिमायतनगर, सिरंजणी, पिंपरी, पोटा, बोर्गडी, धानोरा व जिरोणा आदी गावांतील नागरिकांसाठी हे शिबिर महत्त्वाचे ठरणार आहे. या शिबिरात जुन्या महसुली नोंदी तपासण्याचे आवाहन महसूल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकारःखरेदी

माहिती मिळाल्याचा दि.०९/०९/२०२६ फेरफाराचा दि.१०/०९/२०२६लिहून देणार:अमरिनबेगम शेख आजीमोदीन,इराम सबा शेख आजीमोदीन झोया मेहविश शेख आजीमोदीन,रुमान शेख आजीमोदीन,शमिमबेगम शेख आजीमोदीन,शेख मोहम्मद सादिक आजीमोदीन रा.भोकर(खाता क्र.७९९)यांचे गट/सर्व्हे क्र.१३३ लागवडीयोग्य क्षेत्र ०.७४६२ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी.पोटखराब क्षेत्र ०.०००० हे.आर.चौ.मी.हे त्यांनी गट क्र.१३३ मधील क्षेत्र ०.०१११ शेख आजीमोदीन हाजी शेख नबीसाब यांनी हयात असताना दस्त क्र.१२१९दि.११/०८/१९९५रोजी प्रकाश रामजी बच्चेवाड यांना विक्री असून आज रोजी कै.शेख आजीमोदीन हाजी शेख नबीसाब यांच्या वारसाच्या नावे सामाईक क्षेत्र आहे करिता म.ज.म.अ.१९६६ चे कलम १४९व१५०अन्वये नोंद घेण्यात आली मंजूरीस्तव सादर लिहून घेणार:प्रकाश रामजी बच्चेवाड,(खाता क्र.१२५०९)गट/सर्व्हे क्र.१३३लागवडीयोग्य क्षेत्र ०.०१११ हे.आर. चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दुय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्रमांक १२१९दि.११/०८/१९९५ प्रमाणे रक्कम रुपये ४०००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणार्याचे नाव गाव नमूना न.७/१२ वर दाखल केले.ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन /फ ेरफाराच्या नोंदवहीवरुन मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदी संबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी अथवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे ग्राम महसूल अधिकारी यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे गृहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर.**

# गुत्तेदाराची मर्जी सांभाळण्यासाठी निविदा भरण्याची क्षमता केली कमी !

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १० सप्टेंबर -**

लातुर व धाराधिव जिल्ह्यातील मांजरा, रेणा व तेरणा नदीवरील अनेक वर्षापासुन दुरुस्तीच्या प्रतिक्षेत बॅरेज दुरुस्ती कामांच्या निविदेत सावळा गोंधळ होत असुन गुत्तेदारांची मर्जी सांभाळण्यासाठी पी. क्यु. (पोस्ट क्लॉलिफिकेशन) बदलण्यात येत असल्याचे वृत्त नकतेच तरुण भारत मध्ये प्रकाशित करण्यात आले होते. वृत्त प्रकाशित करण्यात आल्यानंतर आता या निविदेतील अनेक धक्कादायक प्रकार उघडकिस येत असुन शासन कंत्राटदाराची निविदा भरण्याची क्षमता कमी करण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

**मांजरा, रेणा व तेरणा बॅरेजच्या निविदेत सावंळा गोंधळ प्रकरण**

मांजरा, रेणा व तेरणा बॅरेजच्या कामात नांदेड यांत्रिकी मंडळाने नियंत्रणाच्या नावाखाली प्रचंड प्रमाणात अनियमितता करण्यात येत आहे. मर्जीतील गुत्तेदारांची मर्जी सांभाळण्यासाठी पी. क्यु. (पोस्ट क्लॉलिफिकेशन) कशा प्रकारे बदलण्यात आले आहेत. ही बाब नुकतीच उघड करण्यात आली होती तर आता मर्जीतील गुत्तेदारास काम देता यावे या उद्देशाने शासन निर्णय ०५/०७/२०१८ मधील पाश्चात आर्हता मुद्दा क्र. ९.१ मधील बाब (५) ज्यानुसार कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity) कमी करण्यात आली आहे. आपल्या मर्जीतले गुत्तेदार पात्र करण्यासाठी सर्व खटाटोप चालू असल्याचे खात्रीलायकरित्या समजले आहे.

कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity) ठरवितांना एकुण कामाचा कालावधी गृहीत धरावा लागतो. दुरुस्ती कामासाठी दिड वर्षाचा कालावधी देण्यात आला आहे व एकुण पाच वर्षाचा नियमित वार्षिक दुरुस्ती कालावधी देण्यात आल्याने कामाचा एकूण कालावधी हा साडे सहा वर्षाचा होतो. कराड येथील एका कंत्राटदारास सर्व कामांच्या निविदा भरता याव्यात या उद्देशाने कामाचा कालावधी निविदा सुचनामध्ये केवळ दिड वर्षाचा ठेवण्यात आला आहे. यावरून निविदेमध्ये कंत्राटदाराची निविदा भरण्याची सक्षमता (Bid Capacity) जाणीवपूर्वक कमी केल्याचे स्पष्ट होते.

एकुणच सर्व निविदा या जाणीवपूर्वक चुकीच्या बनविण्यात आल्या आहेत. जेणे करून अभियंता वर्गाला व गुत्तेदारांसोबत 'आधा हमारा आधा तुम्हारा' करता येईल.

त्यामुळे मांजरा रेणा व तेरणा या निविदेमध्ये शासनाने तातडीने हस्तक्षेप करून शासन निर्णयाप्रमाणे निकष ठेवून नव्याने निविदा मागवण्यात व अभियंता वर्गाने केलेल्या अनियमिततेची तातडीने चौकशी करून हा प्रकार थांबवावा ही मागणी होत आहे.

जा.क्र. २/४३/२०२६
दि.०९/०९/२०२६

### जाहीर प्रगटन

**मा. श्री. प्रसाद एस. ठाकरे, दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर नायगांव (बा.) यांच्या न्यायालयात**

दिवाणी किरकोळ अर्ज १६३/२०२६
वत्सला गजभारे व इतर ३ वि. निरंक

अर्जदार:- १. वत्सला भ्र. देविदास गजभारे
वय: ५५ वर्षे, धंदा घरकाम
२. प्रदिप पि. देविदास गजभारे वय: ३६ वर्षे, चंदा मजुरी
३. भाग्यश्री पि, देविदास गजभारे
वय : २३ वर्षे, धंदा घरकाम तिघे रा. धुप्पा पो. रामतीर्थ ता. नायगांव जि. नांदेड
४. कल्पना भ्र. गौतम पैठणे
वय: ३ वर्षे, चंदा घरकाम मु.झरी पो. विष्णुपुरी नांदेड

विरुध्द
गैरअर्जदार:- निरंक

दावा:- बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत...

या जाहीर प्रगटणाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, मयत देविदास लिंगोजी गजभारे यांच अर्जदार क्र.०१ पत्नी आहे. व अर्जदार क्र.०२ ते ४ ही मुले आहेत. मयत देविदास लिंगोजी गजभारे यांचा मृत्यु दि०८/०६/२०२६ रोजी शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय विष्णुपुरी नांदेड येथे झाला. अर्जदाराशिवाय मयतांचे कोणीही बारस नाहीत असे अर्जदारांनी अर्जात नमूद केले आहे. अर्जदार यांनी मयत देविदास लिंगोजी गजभारे यांचा वारसा प्रमाणपत्र मिळणेसाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

तरी या जाहीर प्रगटण द्वारे सर्व संबंधीतांना कळविण्यात येते की, वरील संबधिताना मयताचे वारस म्हणून प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप अथवा उजर असल्यास त्यांनी स्वतः किंवा आपल्या वकिला मार्फत ३० दिवसाच्या आत दिनांक १५/१०/२०२६ रोजी सकाळी ११ वाजता या न्यायालयात हजर राहावे अन्यथा अर्जदारा तर्फे योग्य तो निर्णय दिला जाईल याची सर्व जबाबदारी आपणा वर राहील. याची नोंद घ्यावी.

आज दिनांक ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

**क. लिपिक**
**दि.न्या., क. स्तर, नायगांव**

**सहाय्यक अधिक्षक**
**दि.न्या., क. स्तर, नायगांव**

**सिडको**
शहरांचे शिल्पकार

( शहर व औद्योगिक विकास महामंडळ, महाराष्ट्र मर्या.)

सिडको नवीन नांदेड प्रकल्प.

### जाहीर प्रगटन

सिडको नवीन नांदेड प्रकल्पातील सिडकोच्या गृहनिर्माण योजनेतील घरांसाठी मुळ मालकाच्या अनुपस्थितीत घरांचे हस्तांतरण करणे बाबत सूचना

सिडकोच्या नवीन नांदेड प्रकल्पातील गृहनिर्माण योजनेतील घरे मुळ मालकाच्या अनुपस्थितीत घरांच्या हस्तांतरणाच्या अनुषंगाने ०१ वर्षाच्या कालावधीसाठी अभय योजना जारी करण्यात आलेली आहे.

(१) सिडको नवीन नांदेड प्रकल्पातील गृहनिर्माण योजनेतील घरधारकांनी नोंदणीकृत दस्त आधारे अन्य व्यक्तीस मालमत्ता हस्तांतरीत केल्या असतील, मुळ वाटपधारक व आताचे ताबेदार यांच्या व्यवहाराचे लिंक लागत असेल तसेच आताच्या ताबेदाराकडे सिडकोची मुळ दस्तऐवज उपलब्ध असतील अशा प्रकरणात अटी व शर्तीनुसार हस्तांतरण करण्याची परवानगी देण्यात येईल.

(२) मुळ वाटपधारकाने अनोंदणीकृत दस्तआधारे एक किंवा त्या आधारावर त्यापेक्षा जास्त वेळा मालमत्तेचे हस्तांतरण झाले असेल अशा सर्व व्यवहारांची लिंक स्पष्टपणे जुळत असेल व मुळ वाटप धारक आणि आताचे ताबेदार नोंदणीकृत दस्त तयार करून घेण्यात तयार असतील अशा प्रकरणात अटी व शर्तीनुसार हस्तांतरण करून घेणे योग्य होईल. अशा प्रकरणात सिडको हस्तांतरण करण्याची परवानगी अटी व शर्तीनुसार देण्यात येईल.

(३) मुळ वाटपधारकाने अनोंदणीकृत दस्त आधारावर बहु हस्तांतरणे झाले असतील व हस्तांतरणाची संपुर्ण लिंक जुळत नसेल अथवा आताचे ताबेदार नोंदणीकृत दस्त करून घेउ इच्छित नसतील अशा प्रकरणामध्ये सिडको तर्फे हस्तांतरण करण्याची परवानगी देता येणार नाही. अशा प्रकरणांमध्ये अर्जदाराने सक्षम न्यायालयाकडून नियमीत हस्तांतरणाच्या पुढील प्रक्रीयेसाठी रितसर आदेश प्राप्त करून घ्यावेत.

अनु.क. १ व २ वर्गीकरणातील अशी प्रकरणे नियमित करण्यापुर्वी सिडको, नांदेड वाघाळा म हानगरपालिका व शासनाची संपुर्ण थकबाकी भरण्याची जबाबदारी आत्ताच्या ताबेदाराची / अर्जदाराची राहील. तसेच भविष्यात उदभवणाऱ्या वादाबाबतची जबाबदारी ही अर्जदाराची राहील व तशा प्रकारे त्यांनी इंडिमीनीटी बॉड सादर करणे बंधनकारक राहील.

करीता या जाहीर प्रगटनाद्वारे सिडको नांदेड प्रकल्पातील गृहनिर्माण योजनेतील घरधारकांना सूचित करण्यात येते की, शासनाच्या अभय योजना सुवर्णसंधीचा लाभ घ्यावा.

**प्रशासक**
**सिडको, नवीन नांदेड**